सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, ०२ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३३६ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# संतोष देशमुख हत्येत वाल्मिक कराडच मास्टरमाईंड!

## आरोपपत्रात खंडणी, ॲट्रॉसिटी आणि हत्येचा एकत्रित उल्लेख

बीड : सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी वाल्मिक कराड हाच मुख्य सूत्रधार असल्याचे सीआयडीने दाखल केलेल्या आरोपपत्रातून समोर येत आहे. अवादा कंपनीकडे मागितलेल्या खंडणीतून झालेल्या वादानंतर ही हत्या करण्यात आली, असा उल्लेख पोलिसांनी दाखल केलेल्या आरोप पत्रात करण्यात आला आहे. खंडणी, ॲट्रॉसिटी आणि हत्या या तिन्ही घटनांचा आरोप पत्रात एकत्रित उल्लेख करण्यात आला आहे.

दरम्यान, सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला दोन महिन्यांहून अधिकचा कालावधी उलटला असला तरी हत्येच्या कटातील आरोपी असलेला कृष्णा आंधळे हा अद्याप फरार आहे. आरोप पत्रात फरार आरोपी कृष्णा आंधळे याचा नंबर आठव्या क्रमांकावर आहे.

२६ फेब्रुवारी रोजी विशेष सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांना नियुक्त केले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात सीआयडी बीडच्या विशेष मकोका कोर्टात वाल्मिक कराडसह आठ आरोपींच्या विरोधात एक आरोप पत्र दाखल झाले. हे साधारण १४०० पानांचे आरोपपत्र असून खंडणीसह अपहरणाच्या प्रकरणात मोठे उलगडे आणि गौप्यस्फोट होण्याची शक्यता आहे.

आरोपींना फरार करण्यास मदत करणारे डॉ. संभाजी वायबसे दांपत्य, बालाजी तांदळे, संजय केदार, सारंग आंधळे यांची चौकशी करुन यांना तात्काळ सहआरोपी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पोलिसांनी सादर केलेल्या आरोप पत्रात पहिल्या क्रमांकाचा गुन्हेगार हा वाल्मिक कराड आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर विष्णू चाटे, तिसऱ्या क्रमांकावर सुदर्शन घुले आणि त्या खालोखाल प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, जयराम



चाटे, कृष्णा आंधळे यांचा समावेश आहे. या प्रकरणातील आरोपींची क्रमवारी ही त्यांच्या कृत्यानुसार ठरवण्यात आली आहे. यातील प्रमुख आरोपी हा सुदर्शन घुले असून त्यानेच सरपंच देशमुख यांना जबर मारहाण केल्याचे यात उल्लेख करण्यात आला आहे. असेच संतोष देशमुख यांना घेऊन जाणारा व्यक्तीही सुदर्शन घुले होता.

खंडणी, ट्रॉसिटी आणि हत्या तिन्ही घटनांचा आरोप पत्रात एकत्रित उल्लेख

डरपीीह ऊशीहीींझह ीीवशी लरीश : २९ नोव्हेंबरला सुदर्शनच्या फोनवरून वाल्मिक कराडने खंडणी मागितली होती. त्यानंतर सहा डिसेंबरला देशमुख यांचा सुदर्शन घुले, प्रतीक घुले आणि सांगळेशी वाद झाला आणि मारहाण झाली. या महाराणीच्या प्रकरणामध्ये ट्रॉसिटी दाखल झाली होती. त्यानंतर ९ तारखेला देशमुख यांची हत्या झाली होती. या तिन्ही प्रकरणामध्ये जे आरोपी आहेत ते एकत्रित असून त्यांनी हा कट कुठे रचला, याची संपूर्ण माहिती पोलीस आणि सीआयडीच्या हाती लागली आहे. याशिवाय देशमुख यांना मारहाण करताना व्हिडिओ सीआयडीकडे उपलब्ध आहे. खंडणी मागितली आणि ती न दिल्यामुळे देशमुख यांची हत्या करण्यात आली, हे जवळजवळ उघड असल्याने ८० दिवसांमध्ये पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले आहे. पाच गोपनीय साक्षीदारांच्या जबाबानंतर खंडणी, ट्रॉसिटी आणि हत्या या तिन्ही घटनांचा आरोप पत्रात एकत्रित उल्लेख करण्यात आला आहे.

संतोष देशमुख यांची हत्या केल्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील वाशी येथून आरोपी पळून गेले होते. त्यावेळी वाशी येथील पारा चौकातील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना मिळाले आहे. स्कॉर्पिओत एकूण सहा आरोपी होते. केज पोलीस आरोपींचा पाठलाग करत होते. पोलिसांनी वाशी चौकात नाकाबंदीही केली होती. पोलीस पाठलाग करत असल्याची माहिती मिळताच आरोपी गाडी सोडून पळून गेले होते. या घटनेचा ९ डिसेंबर संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना मिळाले आहे. घटना घडल्यानंतर देशमुख यांचा मृतदेह केज रुग्णालयात नेण्याऐवजी पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील यांनी कळंबकडे कोणाच्या सांगण्यावरून वळवला याची चौकशी करण्यात यावी.

# शेअर मार्केटमध्ये नुकसान, युवकाने घेतले स्वतःला जाळून



नाशिक : शेअर मार्केटमध्ये नुकसान झाल्यामुळे एका युवकाने स्वतःला जाळून घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याबाबत सातपूर पोलीस ठाण्यामध्ये अकस्मात मृत्यू हा दाखल करण्यात आलेला आहे पुढील तपास पोलीस करीत आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की सध्या शेअर बाजारामध्ये मोठ्या प्रमाणावरती उलाढाल सुरू आहे शेअर बाजार हा दिवसेंदिवस खाली उतरत आहे त्यामुळे नाशिक शहरात राहत असलेला आणि मूळचा नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील एका छोट्याशा गावामध्ये राहत असलेला राजेंद्र शिवाजी कोल्हे या ३० वर्षीय युवकाने शेअर बाजारामध्ये सुमारे १५ लाख रुपयांचे नुकसान झाले.नाशिकमध्ये नोकरी करून आई-वडिलांना पैसे न देता ते शेअर बाजारामध्ये अडकविले वेळप्रसंगी आपल्या मित्र मंडळा कडून पैसे घेऊन ते शेअर बाजारामध्ये अडकविले परंतु शेअर बाजारामध्ये दिवसेंदिवस नुकसान होत गेल्याने हा युवक हतबल झाला होता अखेर या युवकाने महाशिवरात्रीच्या दिवशी त्रंबकेश्वर येथे जाऊन त्रंबकेश्वर चे दर्शन घेतले आणि येताना पिंपळगाव बहुला या ठिकाणी असलेल्या एका मोकळ्या जागेमध्ये आपली दुचाकी घेऊन जाऊन ती सर्वप्रथम पेटवली आणि अंगावरती पेट्रोल ओतून स्वतः ला जाळून घेतले पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी गेले आणि त्यांनी जिल्हा रुग्णालयामध्ये राजेंद्र कोल्हे याला दाखल केले परंतु उपचार सुरू असताना त्याचे शनिवारी निधन झाले.

# प्रवासवर्णनकार डॉ. मीना प्रभू यांचे निधन



मुंबई : प्रवासवर्णनकार, कादंबरीकार, लेखिका, कवयित्री डॉ. मीना प्रभू यांचे निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या. मागील काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. खासगी रुग्णालयात उपचार घेत होत्या.

डॉ. मीना प्रभू या मूळच्या पुण्याच्या होत्या. लग्नानंतर डॉ. मीना प्रभू लंडनमध्ये स्थायिक झाल्या होत्या. भूलतज्ज्ञ असलेल्या डॉ. मीना प्रभू यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनांनी त्यांना लोकप्रियता मिळवून दिली. ‘माझं लंडन’ हे त्यांचे पहिले प्रवासवर्णन. डॉ. मीना प्रभू यांनी १२ पेक्षा जास्त प्रवासवर्णने लिहिली आहेत. ‘माझं लंडन’, ‘इजिप्तायन’, ‘तुर्कनामा’, ‘ग्रीकांजली’, ‘चिनी माती’ अशी अनेक प्रवासवर्णनांची पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. आयुष्यात डॉ. मीना प्रभू यांनी अनेक देशांचा प्रवास केला. या देशांविषयी त्यांनी प्रवासवर्णने लिहिली आहेत. त्यांचे प्रवासवर्णनांवरील लेख विविध वृत्तपत्रे, मासिके यामध्ये प्रकाशित झाले होते.

गोव्यात झालेल्या महिला साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद डॉ. मीना प्रभू यांनी भूषविले होते. त्यांना २०१० चा दि. बा. मोकाशी पुरस्कार, २०११ चा गो. नी. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मृण्मयी पुरस्कार, २०१२ चा न. चिं. केळकर पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळाले. त्यांच्या अनेक पुस्तकांना राज्य शासनाचे पुरस्कार मिळाले. त्यांनी २०१७ मध्ये पुण्यात ‘प्रभू ज्ञानमंदिर’ नावाची किंडल लायब्ररी सुरू केली.

# पासपोर्टसाठी जन्म प्रमाणपत्र अनिवार्य

नवी दिल्ली : केंद्र सरकारने पासपोर्ट बनवण्यासाठी जन्म प्रमाणपत्र अनिवार्य केले आहे. यासाठी, पासपोर्ट नियम १९८० मध्ये सुधारणा करण्यात आली आहे, ज्या अंतर्गत ऑक्टोबर २०२३ नंतर जन्मलेल्यांसाठी जन्मतारखेसाठी एकमेव कागदपत्र म्हणजे जन्म आणि मृत्यु निबंधक, महानगरपालिका किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाने जारी केलेले जन्म प्रमाणपत्र असेल. परराष्ट्र मंत्रालयाने २४ फेब्रुवारी २०२५ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत असे म्हटले होते की, पासपोर्ट कायदा १९६७ मधील कलम २४ च्या तरतुदींनुसार पासपोर्ट नियमांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. पासपोर्ट सुधारणा नियम २०२५ अधिकृत राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून लागू होतील.

# ‘एडवर्ड’ थिएटर अखेर बंद

मुंबई : इंग्रजी व हिंदी चित्रपटांनी नेहमी गजबजून जाणारे व सुमारे १०५ वर्षांचा इतिहास असलेले काळबादेवी येथील ब्रिटिशकालीन एडवर्ड थिएटर अखेर बंद झाले. तब्बल १०० वर्षांपेक्षा जास्त काळ तग धरून राहिलेल्या या थिएटरमध्ये कोरोना महामारीनंतर प्रेक्षकांच्या शिट्या कधी ऐकू आल्याच नाहीत. मुंबई शहर व उपनगरात सिंगल स्क्रीनची काही चित्रपटगृहे उरली आहेत. यात ब्रिटिशकालीन एडवर्ड थिएटरचा समावेश आहे. डबल बाल्कनी असलेल्या या चित्रपटगृहाला प्रेक्षकांनी अक्षरशः उचलून घेतले होते. गिरगाव, चिरा बाजार, चंदनवाडी, काठचादेवी या मराठी लोकवस्तीमध्ये असलेल्या या चित्रपटगृहाचा प्रवास थक करणाराच आहे. साधारणतः १९२० मध्ये हे चित्रपटगृह प्रेक्षकांच्या सेवेत दाखल झाले. २०२२ पर्यंत म्हणजेच कोरोना महामारीपर्यंत मा चित्रपटगृहामध्ये हिंदी, इंग्रजी चित्रपट झळकत होते. विशेष म्हणजे पूर्वी इतकी गर्दी राहिली नसली तरी प्रेक्षक आवर्जून या चित्रपटगृहातील बाल्कनीमधून चित्रपट पाहण्यासाठी आवर्जून येत होते. पण प्रेक्षक नसल्यामुळे बाल्कनीही बंद झाल्या. हे चित्रपटगृह फक्त स्टॉलपुरते मर्यादित राहिले, कालांतराने प्रेक्षकांपेक्षा रिकामी खुर्च्याच चित्रपट बघू लागल्या.कोरोना महामारीनंतर एडवर्ड थिएटर पुन्हा नव्या दमाने प्रेक्षकांच्या सेवेत उतरेल असे वाटत होते. पण या चित्रपटगृहांमध्ये चित्रपट झळकलाच नाही. आता या चित्रपटगृहाला उतरती कळा लागली असून हे चित्रपटगृह येणाऱ्या काळात इतिहासजमा होण्यास वेळ लागणार नाही. मुळात मल्टिप्लेक्स सिनेमागृहांमुळे सिंगल स्क्रीनचे चित्रपटगृह टप्प्याटप्प्याने बंद होत गेले. याला एडवर्डही अपवाद नाही.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २ मार्चला ‘परिवहन भवना’चे भुमिपुजन

मुंबई : परिवहन विभागाचे मुख्यालय असलेल्या परिवहन भवन या नव्या इमारतीचे भूमिपूजन २ मार्च रोजी दुपारी २ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते होणार आहे. याप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे हे उपस्थित राहणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

रस्ते वाहतुकीची नियमन करण्यासाठी १ मार्च १९४० ला तत्कालीन मुंबई राज्याचा परिवहन विभाग अस्तित्वात आला. त्यामुळे १ मार्च हा दिवस परिवहन दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाची औचित्य साधून या रविवारी सर पोचखानवाला मार्ग वरळी, मुंबई येथे मुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते ४ मजली प्रशस्त अशा परिवहन भवन या इमारतीचे भूमिपूजन संपन्न होत आहे. सुमारे १२८०० चौरस मीटर बांधकाम क्षेत्र असलेल्या या इमारतीमध्ये एकावेळी १५० चारचाकी वाहने उभी करता येतील, इतकी चार मजल्याची भूमिगत पार्किंग व्यवस्था निर्माण करण्यात येणार आहे. हि इमारत पुढील अडीच वर्षांत बांधून पूर्ण केली जाणार आहे.

विशेष म्हणजे राज्याला दरवर्षी १५ हजार कोटी रुपये महसूल मिळवून देणाऱ्या या विभागाच्या मुख्यालयाला स्वतःची इमारत नव्हती. परिवहन विभाग स्थापन झाल्यापासून तब्बल गेली ८५ वर्ष या विभागाचे मुख्यालय भाड्याच्या इमारतीमध्ये होते. परिवहन मंत्री म्हणून प्रताप सरनाईक यांनी पदभार स्वीकारल्यानंतर परिवहन विभागाच्या पहिल्या बैठकीमध्ये परिवहन विभागाच्या मुख्यालयाची स्वतःची इमारत बांधण्याचा संकल्प सोडला. एवढंच नाही तर त्यांनी सातत्याने पाठपुरावा देखील केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते परिवहन भवन या परिवहन विभागाच्या मुख्यालयाचे येत्या रविवारी भुमिपुजन होत आहे.

# व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किंमतीत ६ रुपयांची वाढ

नवी दिल्ली : ऐन होळी आणि ईदपूर्वी सरकारी कंपन्यांनी व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किंमतीत वाढ जाहीर केली आहे. इंडियन ऑईलने १ मार्चपासून १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किंमतीत ६ रुपयांची वाढ केली आहे, त्यामुळे दिल्लीत या सिलिंडरची किंमत १७९७ रुपयांवरून १८०३ रुपयावर पोहोचली आहे. दरम्यान घरगुती वापराच्या सिलिंडरच्या किमतीत कोणताही वाढ करण्यात येत नसल्याचं कंपन्यांकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

सरकारी कंपन्यांकडून दर महिन्याच्या पहिल्या दिवशी सिलिंडरच्या किमतींचा आढावा घेतला जातो. त्यानुसार या कंपन्यांनी आजपासून नव्या किंमती लागू केल्या आहेत. मात्र,



हा सणासुदीचा महिना आहे. याच महिन्यात होळी आणि ईद हे सण आहेत. उद्यापासून रमजानचा महिना सुरु होतं आहे. याशिवाय अनेक लग्नकार्यही या महिन्यात पार पाडणार आहेत. त्यामुळे बाहेर रेस्टॉरंटमध्ये जेवण किंवा इतर पदार्थ महाग होण्याची शक्यता आहे.

नव्या दरानुसार दिल्लीत १९ किलोच्या सिलिंडरची किंमत १७९७ वरून १८०३ रुपये करण्यात आली आहे. तर कोलकातामध्ये या सिलिंडरची १९०७ वरून १९१३ रुपये झाली आहे. मुंबईत व्यावसायिक सिलिंडरचे दर १७४९.५० वरून १७५५.५० रुपयांवर पोहोचले आहेत. तर चेन्नईमध्ये, व्यावसायिक सिलिंडरचे दर १९५९ वरून १९६५ रुपयांवर पोहोचले आहेत.

# वेटिंग तिकीटावर प्रवास केल्यास दंड! ट्रेन तिकीट बुकिंगचे नवे नियम लागू

मुंबई : भारतीय रेल्वे ही देशातील सर्वांत मोठी परिवहन व्यवस्था असून, दररोज लाखो प्रवासी या माध्यमातून प्रवास करतात. नुकतेच भारतीय रेल्वेने तिकीट बुकिंग प्रक्रियेमध्ये अनेक महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. याबाबत नवी नियमावली जारी केली असून आजपासून नवे नियम लागू करण्यात आले आहेत. जाणून घ्या काय आहेत ते नियम.

ॲडव्हान्स रिझर्वेशन पीरियड मध्ये बदल

भारतीय रेल्वेच्या नवीन नियमांमध्ये सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे ॲडव्हान्स रिझर्वेशन पीरियड १२० दिवसांवरून ६० दिवसांपर्यंत कमी केले आहे. यामुळे प्रवाशांना त्यांच्या यात्रेचे अधिक अचूक नियोजन करण्यास मदत करेल. बहुतेक प्रवासी त्यांच्या प्रवासाचे नियोजन दोन महिन्यांपेक्षा जास्त आधी करत नाहीत, त्यामुळे हा कालावधी व्यावहारिक दृष्टिकोनातून अधिक योग्य ठरणार आहे.

वेटिंग तिकीटसाठी नवे नियम

आतापर्यंत अनेक प्रवासी वेटिंग तिकीटवर रिझर्व्हेशन डब्यात प्रवास करत होते.. यामुळे कन्फर्म तिकीट असलेल्या प्रवाशांना गर्दीचा नाहक त्रास सहन करावा लागत होता. यामुळे प्रशासनाने आता वेटिंग तिकीट केवळ जनरल डब्यात मान्य असेल, असा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, वेटिंग तिकीट असलेले प्रवासी केवळ जनरल डब्यात प्रवास करू शकणार आहेत. परंतु जर कोणी वेटिंग तिकीटवर रिझर्व्हेशन डब्यात प्रवास करताना आढळल्यास त्यांना एसी कोचसाठी ४४० रुपये तर स्लीपर कोचसाठी २५० रुपये दंड भरावा लागणार आहे.

तत्काल तिकीट बुकिंगमध्ये सुधारणा

प्रवाशांना अंतिम क्षणी तिकीट मिळवून देणाऱ्या तत्काल तिकीट बुकिंग सुविधेतही भारतीय रेल्वेने बदल केले आहेत. नवीन नियमांनुसार तत्काल बुकिंगसाठी वेळ विभागणी करण्यात आली आहे. याआधी सर्व प्रकारच्या तत्काल तिकिटांसाठी एकाच वेळी बुकिंग सुरू होते. मात्र आता एसी क्लाससाठी सकाळी १० वाजता तर नॉन-एसी क्लाससाठी सकाळी ११ वाजता तत्काल बुकिंग सुरू होईल.

दरम्यान, तत्काल तिकिटांच्या किंमतींमध्येही बदल करण्यात आले आहेत. आता प्रवासाच्या अंतरावर तिकीट किंमत लागू असणार आहे. तथापि, तत्काल तिकिटांवर किमान आणि कमाल मर्यादा कायम ठेवण्यात आली आहे.

रिफंड पॉलिसीमध्ये बदल

भारतीय रेल्वेने रिफंड पॉलिसीमध्ये देखील लक्षणीय बदल केले आहेत. नवीन नियमांनुसार प्रवाशांना ट्रेन रद्द झाल्यास संपूर्ण तिकीट रक्कम परत मिळेल. तसेच ट्रेन तीन तासांपेक्षा जास्त उशीरा धावल्यास प्रवाशांना पूर्ण रिफंड मिळू शकेल.

तसेच यापूर्वी प्रवासी त्यांचे प्रवासाचे नियोजन बदलल्यास रिफंड मिळवू शकत होते, परंतु आता ही सुविधा मर्यादित केली गेली आहे. नवीन नियमांनुसार प्रवासापूर्वी २४ तासांपेक्षा जास्त काळात रद्द केल्यास ५० टक्के रिफंड मिळू शकणार आहे. प्रवासापूर्वी १२-२४ तासांच्या दरम्यान रद्द केल्यास २५ टक्के रिफंड मिळणार आहे. तर प्रवासापूर्वी १२ तासांपेक्षा कमी वेळेत रद्द केल्यास रिफंड मिळणार नाही.

परदेशी पर्यटकांसाठी विशेष सुविधा

परदेशी पर्यटकांसाठी भारतीय रेल्वेने विशेष सुविधा उपलब्ध केली आहे. त्यांच्यासाठी ॲडव्हान्स रिझर्वेशन पीरियड ३६५ दिवस कायम ठेवण्यात आला आहे. तसेच परदेशी पर्यटकांना विशेष पर्यटक कोटा देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे, ज्यामध्ये प्रत्येक ट्रेनमध्ये काही निवडक सीट्स राखीव ठेवण्यात आल्या आहेत. या सुविधेमुळे पर्यटन क्षेत्राला प्रोत्साहन मिळेल आणि देशात अधिक परदेशी पर्यटक येतील.

## ‘पुरुषांना लैंगिक गुन्ह्यात अडकवण्याची प्रवृत्ती वाढली’

# पोलीस केवळ महिलेच्या वक्तव्याच्या आधारे कारवाई करू शकत नाहीत

### केरळ हायकोर्टाचे मत

तिरुअंतपुरम : लैंगिक गुन्ह्यांमध्ये तक्रारदाराचे प्रत्येक विधान खरे आहे, असे गृहीत धरणे योग्य नाही. हल्ली निष्पाप लोकांना फसवण्याची प्रवृत्ती वाढली आहे. असे मत केरळ उच्च न्यायालयाने व्यक्त केला. एका महिला कर्मचाऱ्याने लैंगिक छळाच्या आरोपाखाली व्यक्तीला अटकपूर्व जामीन मंजूर करताना न्यायमूर्ती पी. व्ही. कुन्हिकृष्णन यांनी हे मत व्यक्त केले आहे.

आरोपीच्या केसचीही चौकशी करणे आवश्यक

न्यायालयाने म्हटले आहे की, या प्रकरणात पोलिसांनी आरोपीच्या तक्रारीची चौकशी केली नाही, ज्यामध्ये त्याने म्हटले होते की नोकरीवरून काढून टाकल्यानंतर महिलेने त्याला शिवीगाळ केली आणि धमकी दिली. फौजदारी खटल्याचा तपास म्हणजे केवळ तक्रारदाराच्या बाजूची चौकशी करणे एवढेच नाही. तर आरोपीच्या केसचीही चौकशी करणे आवश्यक आहे. तक्रारदार महिला असल्याने तिचे प्रत्येक विधान खरे आहे, असे गृहीत धरणे योग्य नाही. पोलीस केवळ तिच्या वक्तव्याच्या आधारे कारवाई करू शकत नाहीत. आरोपीच्या प्रकरणाचीही गांभीर्याने चौकशी झाली पाहिजे, असे न्यायालय म्हणाले.

लैंगिक छळाच्या खोट्या आरोपात पुरुषांना फसवण्याचा ट्रेंड

आजकाल लैंगिक छळाच्या खोट्या आरोपात पुरुषांना फसवण्याचा ट्रेंड (ऊीळाश) निर्माण झाला आहे. जर पोलिसांना महिलेने केलेले आरोप खोटे असल्याचे आढळले तर ते तक्रारदारावरही कारवाई करू शकतात. कायदाही असेच म्हणतो. जर एखाद्या व्यक्तीला खोट्या आरोपांमध्ये अडकवले गेले तर त्याचे नाव, समाजातील प्रतिष्ठा आणि दर्जा खराब होऊ शकतो. केवळ आर्थिक भरपाई देऊन ते परत मिळवता येत नाही. गुन्ह्यांच्या तपासादरम्यान कोणत्याही निष्पाप व्यक्तीला इजा होऊ नये म्हणून सत्य तपासताना सावधगिरी बाळगण्याचा आणि सतर्क राहण्याचा सल्ला न्यायालयाने पोलीस अधिकाऱ्यांना दिला.

कंपनीच्या व्यवस्थापकाने वाईट हेतूने हात धरल्याचा आरोप महिला कर्मचाऱ्याने केला होता. त्याचवेळी, आरोपीनेही पोलिसांकडे तक्रार केली होती की महिलेने त्याला शिवीगाळ केली आणि धमकी दिली. या संदर्भात, त्याने महिलेचे कथित जबाब पेन ड्राइव्हमध्ये नोंदवले आणि ते पोलिसांना दिले होते. न्यायालयाने म्हटले की, हा असा खटला होता ज्यामध्ये तपास अधिकाऱ्याने आरोपीच्या तक्रारीची देखील चौकशी करायला हवी होती. न्यायालयाने आरोपीला पेन ड्राइव्ह तपास अधिकाऱ्यांसमोर सादर करण्याचे आदेश दिले आणि तपास अधिकाऱ्यांना त्याची तपासणी करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने आरोपीला ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक जामीन रकमेवर आणि दोन सक्षम जामीनदारांच्या हमीवर जामिनावर सोडण्याचे आदेश दिले.

# छत्तीसगडच्या चकमकीत २ नक्षलवादी ठार

रायपूर : छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यातील किस्ताराम येथे आज, शनिवारी सकाळी सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. या २ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आलेय.

सुकमा जिल्ह्याच्या किस्ताराम येथे प्रमुख नक्षलवादी म्होरक्या दडून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षादलांनी या परिसरात शोध मोहिम हाती घेतली. यादरम्यान ही चकमक उसळली असून अजूनही नक्षलवादी आणि सैनिकांमध्ये अधूनमधून गोळीबार सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले असून त्यांच्याकडील शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत. दरम्यान सुमारे ५०० जवांनी या परिसराला वेढा घातला असून लवकरच दडून बसलेल्या उर्वरित नक्षलवाद्यांवरही कठोर कारवाईची शक्यता आहे.

# हिमस्खलनातील ४७ कामगारांना वाचवण्यात यश

चमौली : उत्तराखंडमधील चमौली जिल्ह्यातील मानाजवळ शुक्रवारी मोठ्या प्रमाणावर हिमस्खलन झाले. घटनास्थळी गेल्या ३० तासांपासून बचावकार्य सुरू आहे. लष्करी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या इतरांसह किमान ४ जखमी कामगारांना मृत घोषित करण्यात आले आहे, अशी माहिती भारतीय लष्कराने दिली.

हिमस्खलनात सीमा रस्ते संघटनेचे (बीआरओ) ५७ कामगार अडकले होते. त्यापैकी आतापर्यंत ४७ कामगारांना वाचण्यात यश आले असून, ५ जणांचा शोध सुरु आहे.

उत्तराखंडमधील चमोली येथे शुक्रवार २८ फेब्रुवारी रोजी सकाळी हिमस्खलन झाले. बद्रीनाथपासून ३ किलोमीटर अंतरावरील चमोलीच्या माना गावात ही घटना घडली. बर्फाचा



ढिगारा कोसळला. हिमस्खलनात बर्फ हटवण्याच्या कामात गुंतलेले सीमा रस्ते संघटनेचे (बीआरओ) कामगार अडकले.

शुक्रवारी रात्री ८ वाजेपर्यंत ३३ जणांना वाचवण्यात यश आले. तर आज, शनिवारी सकाळी १४ जणांना बाहेर काढण्यात आले. तीन जखमी कर्मचाऱ्यांना हेलिकॉप्टरद्वारे माना येथून जोशीमठ येथे गंभीर वैद्यकीय उपचारांसाठी हलविण्यात आले.

घटनास्थळी ३० तासांहून अधिक काळ बचावकार्य सुरू आहे. लष्करी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या इतरांसह किमान ४ जखमी कामगारांना मृत घोषित करण्यात आले आहे, लष्कर, आयटीबीपी, बीआरओ, एसडीआरएफ आणि एनडीआरएफचे २०० हून अधिक सैनिक बचाव कार्यात गुंतले आहेत.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# चैन स्नॅचर पकडला; २ लाख २४ हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर : चेन स्नॅचिंगबाबत दाखल असलेल्या गुन्ह्यांच्या तपासादरम्यान कोतवाली पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी अभिमन्यू विलास कुसळकर – रा. बालाजी नगर, सोनई, ता. नेवासा ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता ७ व २७ फेब्रुवारी रोजी दाखल चेन स्नॅचिंग चे गुन्हे केले असल्याची कबुली दिली. आरोपीने गुन्ह्यात वापरलेली होंडा शाईन मोटरसायकल क्र. एम एच १७ सी यु ४००८

तसेच दोन्ही गुन्ह्यात चोरी केलेला रुपये ०१ लाख ७४ हजार रकमेचा सोन्याचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे.

याचबरोबर आरोपीने कोतवाली पोलीस स्टेशन गु.र.नं. ५९७/२०२४ भादंवि ३९४,३४ दाखल २०/०५/२०२४ रोजी दाखल गुन्ह्याची कबुली दिली. उपरोक्त गुन्हे हे त्यांने त्याचा साथीदार अजय रुस्तम शिंदे, रा. कोठला, अहिल्यानगर याचे सह केल्याची माहीती दिली आहे.

सदरची कारवाई ही जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अहिल्यानगर शहर विभाग अमोल भारती यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, स.पो.नि. योगिता कोकाटे, म.पो.हे.कॉ. रोहीणी दरंदले, पो.हे.कॉ. विक्रम वाघमारे, सुर्यकांत डाके, विशाल दळवी, संदिप पितळे, पो.कॉ. दिपक रोहोकले, तानाजी पवार, सुरज कदम, सचिन लोळगे, दत्तात्रय कोतकर, शिरीष तरटे, संकेत धिवर, राम हंडाळ व मोबाईल सेलचे पो.कॉ. राहुल गुंडु,पो.कॉ.नितीन शिंदे यांनी केली आहे.

## दमदार कलाकारांची मांदियाळी असलेल्या धमाकेदार चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

छत्रपती संभाजीनगर – गेल्या काही दिवसांपासून अभिनेता पुष्कर जोगच्या 'हार्दिक शुभेच्छा पण त्याचं काय?' या आगामी चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू आहे. लैंगिक सुसंगतेवर भाष्य करणारा हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून नुकताच या चित्रपटाचा उत्सुकता वाढवणारा ट्रेलर रसिकांच्या भेटीला आला आहे. चित्रपटाच्या नावावरूनच हा चित्रपट लग्नसंस्था आणि त्यानंतरच्या प्रवासावर आधारित असल्याचे दिसतेय. ट्रेलरमध्ये पुष्कर लग्नासाठी मुली बघत असून त्याच्या आयुष्यात हेमल इंगळे आणि पूर्वी मुंदडा आल्याचे दिसत आहेत. सोबतच त्यांच्या नात्यात काही गुंतागुंतीचे प्रसंगही दिसत आहेत. त्यामुळे पुष्करच्या आयुष्यात नेमकं कोण येणार? त्यांचे वैवाहिक जीवन कसे असणार? 'पण त्याचं काय' हा नेमका काय प्रश्न? तो सुटणार का? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे येत्या २१ मार्चला मिळणार आहेत. ट्रेलरमध्ये पुष्कर नेहमीपेक्षा वेगळ्या लूकमध्ये दिसत आहे तर हेमल आणि पूर्वीही जबरदस्त दिसत आहेत. पुष्करचे चित्रपटांमध्ये नेहमीच भव्यता असते. कथानकात वेगळेपण असतेच याशिवाय तो चित्रीकरणस्थळांमध्येही वैविध्य घेऊन येत असतो. या चित्रपटात प्रेक्षकांना मस्टरडॅम, पॅरिस आणि दुबईची सैरही घडणार आहे.

## २२ मराठा बटालियन – गोष्ट गनिमी काव्याची' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला!

### तगडी स्टारकास्ट असलेल्या चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित

मराठी चित्रपटसृष्टीत ऐतिहासिक आणि थरारक कथानकांनी प्रेक्षकांच्या मनात नेहमीच खास स्थान मिळवलं आहे. त्याच परंपरेला पुढे नेणारा एक दमदार, रोमांचकारी चित्रपट आणि मराठा बटालियनच्या शौर्यगाथेवर भाष्य करणारा '२२ मराठा बटालियन – गोष्ट गनिमी काव्याची' २०२५ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतीच या चित्रपटाची सोशल मीडियावर घोषणा करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक पराक्रमी योद्धेच नव्हते तर कुशल युद्धनीतीकारही होते. त्यांच्या युद्धशैलीत गनिमी कावा' या विशेष तंत्राचा उपयोग करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी कावा तंत्राचे हे विविध पैलू या चित्रपटाच्या निमित्ताने प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहेत.

नुकत्याच झळकलेल्या पोस्टरने रसिकांमध्ये चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण केली आहे. नजरेत भरणारे दाट जंगल आणि त्यात झळकणारा '२२ मराठा बटालियन' हा शब्द प्रेक्षकांना चित्रपटाच्या कथानकाबद्दल नक्कीच विचार करायला लावेल. अद्वितीय साहस, गनिमी काव्याची रणनिती हे सगळे या चित्रपटात पाहायला मिळणार असून हा चित्रपट म्हणजे प्रेक्षकांसाठी एक रोमांचक अनुभव ठरेल, यात शंकाच नाही.

---

**तहसिल कार्यालय गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर मध्यवती प्रशासकीय भवन, सर्व्हे नं. २८१/अ. गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.२०२४/भूसुधार/कुळ/काकि – २ दिनांक– २१/०२/२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. संतोष उत्तम निरफळ व इतर रा. गणेशवाडी ता. गंगापूर यांनी या कार्यालयात विनंती अर्ज सादर करुन त्यांच्या मालकीच्या मौजे सैदापूर येथील सर्वे नं./गट नं. २५ या जमीनीच्या ७/१२ अभिलेखाच्या इतर अधिकारातील नोंद कुळ कुळ कायदा बेकायदेशीर सत्ता बंधित प्रकार हे नांवे कमी करणे बाबत विनंती केलेली आहे.

तेव्हा सदरचे नांव कमी करण्यास कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार असल्यास सदर जाहीर पगटन प्रसिध्द झन्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात या कार्यालयास अभिलेखासह सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप उजर / तक्रार प्राप्त न झाल्यास सदरच्या व्यवहारास कोणाचाही आक्षेप/उजर/तक्रार नाही असे गृहीत धरुन सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

नसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप / उजर / तक्रार दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

तहसिलदार गंगापूर

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.९१/२०२५.

१. कासाबाई सुर्यभान महाजन, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर २. शिवाजी सुर्यभान महाजन, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सुर्यभान देवाजी महाजन यांचा दिनांक १४/०४/२००४ रोजी जरंडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत सुर्यभान देवाजी महाजन यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २१/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.०३/०४/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.

---

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.७८/२०२५.

१. रत्नाबाई कोतीक दांडगे, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. मासरूळ, ता. बुलढाणा, जि. बुलढाणा २. जिजाबाई सदाशिव बागले, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ३. दुर्गादास सदाशिव बागले, वय २३ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे, ४. संतोष सदाशिव बागले, वय १८ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :– वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणंसाठी ॲड, शुभम अ. आगे स्यगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत कौसाबाई कडुबा बागले यांचा दिनांक ०८/०३/२०२३ रोजी सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हे वाग्स आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत कौसाबाई कडुबा वागले यांचे वारस असुन त्यांना शार्साकयः/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रांसह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १७/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पू.ता. २६/०३/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.

---

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.९३/२०२५.

१. राजेंद्र चिंतामण महाजन, वय ५४ वर्षे, धंदा नोकरी, रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर २. उज्वला साहेबराव उबाळे, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरुड, ता. व जि. बुलढाणा.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत चिंतामण देवाजी महाजन यांचा दिनांक २८/०७/२०२३ रोजी जरंडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत चिंतामण देवाजी महाजन यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २१/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.०२/०४/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (कः स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.७४/२०२५.

१. अर्जुन राघो जाधव, वय ६५ वर्षेः धंदा शेती, रा. जामठी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर २. रंगलाल राघो जाधव, वय ५७ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३. सुकलाल राघो जाधव, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४. बेबीबाई हरी चव्हाण, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा. वरसाडा तांडा, ता. पाचोरा, जि. जळगांव, ५. जानकीबाई प्रताप तंवर, वय ५६ वर्षे, धंदा शेती, रा. देव्हारी तांडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ६. जमुनाबाई आनंदा चव्हाण, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. लासोरा तांडा, ता पाचोरा, जि. जळगांव.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत राघो हजारी जाधव यांचा दिनांक ०८/०९/१९९७ रोजी जामठी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत राघो हजारी जाधव यांचे वारस असुन त्यांना शाकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १७/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.२६/०३/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.

---

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.४३/२०२५.

१. जयराम रामचंद्र नवले, वय ८४ वर्षे, धंदा काहीही नाही, रा. निमखेडी, ता.सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. शिवाजी चौक कल्याण, ता. कल्याण, जि. ठाणे. २. भारती रामक्रिष्णा पाटील, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. कल्याण, ता. कल्याण, जि. ठाणे. ३. त्रिवेणी रविंद्र पवार, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. कल्याण, ता. कल्याण, जि.ठाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे स्यगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत लक्ष्मिबाई जयराम नवले यांचा दिनांक १३/१२/२०२४ रोजी कल्याण ता. कल्याण येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत लक्ष्मिबाई जयराम नवले यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १७/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.१३/०३/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.९२/२०२५.

१. सुमनबाई रामदास महाजन, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर २. तुकाराम रामदास महाजन, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ३. अनिल रामदास महाजन, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रामदास देवाजी महाजन यांचा दिनांक ११/०८/२०१६ रोजी जरंडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत रामदास देवाजी महाजन यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २१/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.०४/०४/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.

---

जा.क्र. भूसुधार/म.हाडोळा/मौजे ठाणा/वि.प./सिआर–५८/२०२५

दि. ३१/०१/२०२५

**जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहिररीत्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. अशोक चिंधा दामोदर व इतर रा.फर्दापूर ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर यांनी मौजे ठाणा ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट नं. ३४ क्षेत्र १ हे २० आर वतन महार हाडोळा जमीन मुंबई गाव कामगार व कनिष्ठ वतने नाहीशे करण्याबाबत अधिनियम, १९५८ चे कलम ५ (३) मधील तरतुदीनुसार विक्री करण्यास पूर्व परवानगी मिळणेबाबत संदर्भीय विनंती अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार यांनी सदर जमीन सौ. सोनाली संदीप अग्रवाल रा. पाचोरा ता. पाचोरा जि. जळगाव यांना रक्कम रुपये १०,००,०००/– (अक्षर–दहा लाख रुपये) मध्ये विक्रीव्दारे हस्तांतरण करण्याचे ठरविले असुन त्यांनी त्याबाबत नोटरीकृत इसारपावती दि. १७/१०/२०२३ नुसार केलेले आहे.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र. १०९९/प्र.क्र.२२९/ल–४ दिनांक १० मार्च, २००० नुसार वतन महार हाडोळा स्वरुपाची जमीन खरेदी करण्यास मागासवर्गीय व्यक्तीस प्रथम प्राधान्य आहे. तथापि, वतनदार अथवा जमीनविक्री करणार यांचे गावात व सदर जमिनीपासुन–५ किलोमीटरच्या परिसरात सदर जमीन खरेदी करण्यास एकही मागसवर्गीय व्यक्ती इच्छुक नसल्यास अशा परिस्थितीत गैरमागासवर्गीय व्यक्तीचा देखील उक्त जमीन खरेदीदार म्हणून विचार केला जाऊ शकतो अशा प्रकारची तरतुद करण्यात आलेली आहे.

तेव्हा सदरच्या विक्री / हस्तांतरण व्यवहारास कोणाचा काही आक्षेप / उजर / तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह या कार्यालयास सादर करावा.

विहीत मुदतीत कुलाचा आक्षेप / उजर /तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरचे हस्तांतरणाच्या व्यवहारास कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल यांची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर / तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**(संगीता राठोड)**

**उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हाधिकारी कार्यलय, छत्रपती संभाजीनगर**

---

माझे पक्षकार श्री. १ सोनाली संदीप अग्रवाल, वय– ४० वर्ष धंदा–व्यवसाय रा. पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगाव, यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे/जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि,

मौजे ठाणा शिवार, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर मधील गट क्र. ३४ मधील अशोक चिंधा दामोदर व इतर यांच्या नावे असलेली ०१ हे. २० आर. शेतजमीन जिच्या चतुर्सिमा:– पूर्वेस–नाला, पश्चिमेस–वहीवाटी रस्ता, दक्षिणेला–प्रल्हाद सुखाजी दामोधर यांची शेतजमीन, उत्तरेला– आरख यांची शेतजमीन हि जाहीर प्रगटन/जाहीर नोटीस देणार यांनी अशोक चिंधा दामोधर व इतर रा. फर्दापूर यांच्याकडून रक्कम रुपये १०,००,०००/–दहा लाख रुपये मात्र मध्ये विक्रीद्वारे खरेदीखत हस्तांतरण करण्याचे ठरविले असून, त्यांनी वरील शेतजमीनी बाबत नोटरीकृत इसारपावती १७/१०/२०२३ रोजी केलेली आहे.

तरी सदरच्या विक्री/हस्तांतरण व्यवहारास कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाचे आत लेखी स्वरुपात, कागदोपत्री पुराव्यासह आमचे कार्यालयात सादर करावा. विहित मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरचे हस्तांतरणच्या व्यवहारास कुणाचाही आक्षेप नाही असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहित मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. करिता सदर जाहीर प्रगटन/जाहीर नोटीस दिले आहे.

**सही**

**सोनाली संदीप अग्रवाल**

रा. पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगाव.

सदरची जाहीर नोटिस पक्षकाराचे माहितीवरून आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रांवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्द केली असे.

**मार्फत**

**सही/–**

**ॲड. ए. व्ही. जाधव.**

**मो.नं. ९७६५१९४८४१**

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि.अर्ज क १४८/२०२५

अर्जदार : १) कुसुम बबन बोडखे, वय ७१ वर्षे, धंदा. घरकाम, रा. बगडी पो. रघुनाथनगर ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) किशोर बबन बोडखे, वय. ४० वर्षे, धंदा. शेती, रा. बगडी पो. रघुनाथनगर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) सांगीता भ्र. संजय आसने, वय ४३ वर्षे, धंदा. घरकाम, रा. उंदीरगांव ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर ४) रंजना भ्र. भाऊसाहेब दवंगे, वय ३६ वर्षे, धंदा. घरकाम, रा. कमलापूर, ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर

विरूध्द

गैरअर्जदार : निंरक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, बबन रामराव बोडखे हे बगडी ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. ०१/०१/२०२३ रोजी बगडी ता. गंगापूर येथे मयत झाले आहे. मयत बबन रामराव बोडखे यांना अर्जदार क. १ पत्नी असून अर्जदार क. २ मुलगा तसेच अर्जदार क. ३ व ४ विवाहीत मुली असे वारस असून मयतांना अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत बबन रामराव बोडखे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि. अर्ज क्र. १३६/२०२५

अर्जदार : १) सौरभ कांतीलाल सुकासे, वय. ३१ वर्षे, धंदा. नौकरी, रा. शिवाजीनगर गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) गौरव कांतीलाल सुकासे, वय. २६ वर्षे, धंदा. नौकरी, रा. शिवाजीनगर गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) प्रियंका कांतीलाल सुकाशे, वय. ३४ वर्षे, धंदा. मजुरी, रा. शिवाजीनगर गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) संगीता कांतीलाल सुकाशे, वय. ५२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. शिवाजीनगर गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ५) उषाबाई रावसाहेब भोगे, वय. ५४ वर्षे, धंदा. घरकाम, रा. संजरपूर पो. मालुंजा ता. गंगापूर जि. औरंगाबाद ६) आशाबाई काकासाहेब म्हस्के, वय. ५२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. भेंडाळा ता. गंगापूर जि. औरंगाबाद ७) भागीत्राबाई काकासाहेब सुकासे, वय ८२ वर्षे, धंदा निरंक, रा. शिवाजीनगर, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निंरक

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, काकासाहेब भानुदास सुकासे हे गंगापूर ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. १९/१०/२०२४ रोजी गंगापूर येथे मयत झाले असून त्यांचे पुर्वी त्यांचा मुलगा कांतीलाल काकासाहेब सुकासे हा देखील दि. २८/०३/२००४ रोजी दौलताबाद' ता. जि. औरंगाबाद येथे मरण पावले आहेत. मयत काकासाहेब भानुदास सुकासे यांना अर्जदार क. १ व २ नातु असून अर्जदार क. ३ ही नात आहे तसेच अर्जदार क. ४ ही सुन असून मयत मुलगा कांतीलाल काकासाहेब सुकासे याची पत्नी आहे. तसेच अर्जदार क. ५ व ६ हया मयत काकासाहेब भानुदास यांच्या विवाहीत मुली असून अर्जदार क. ७ ही पत्नी आहे. मयतांना असे वारस असून अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत काकासाहेब भानुदास सुकासे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

सहा अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि.अर्ज क्र. १२८/२०२५

अर्जदार : १) अनिता साहेबराव पोळ, वय. ५५ वर्षे, धंदा. घरकाम, रा. रांजनगांव पोळ ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) सुमित साहेबराव पोळ, वय २१ वर्षे, धंदा. शिक्षण, परीजात नगर, म्हाडा कॉलनी, तिसगांव ता. जि. औरंगाबाद ३) जयश्री भ्र. मिलींद साळवे, वय. ३६ वर्षे, धंदा. मजुरी, रा. गुनवडी, अहमदनगर, ता. जि. अहमदनगर ४) छाया भ्र. मनोज म्हस्के, वय. २९ वर्षे, धंदा. घरकाम, रा. महालगांव ता. वैजापूर जि. औरंगाबाद ५) शांताबाई भ्र. देवराव पोळ, वय. ७० वर्षे, धंदा. निरंक, रा. रांजनगांव पोळ ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निंरक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, साहेबराव देवराव पोळ हे रांजनगांव पोळ ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. २२/०२/२०२० रोजी आजारपणामुळे तिसगांव ता. जि. औरंगाबाद येथे मयत झाले असून त्यांचे पुर्वी त्यांचे वडील देवराव मारूती पोळ हे दि. २२/०१/२००९ रोजी रांजनगांव पोळ ता. गंगापूर येथे मरण पावले आहेत. मयत साहेबराव देवराव पोळा यांना अर्जदार क. १ पत्नी असून अर्जदार क. २ मुलगा तसेच अर्जदार क. ३ व ४ विवाहीत मुलगी व अर्जदार क. ५ ही जन्मदाती आई असे वारस असून मयतांना अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत देवराव मारूती पोळ आणि साहेबराव देवराव पोळ यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र. १४४/२०२५

अर्जदार : १) दत्तात्रय दामोधर तारु वय ५२ वर्षे धंदा मजुरी रा. नेवरगाव ता. गंगापुर ह.मु. मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन रोड जयभवानी नगर जि. छत्रपती संभाजीनगर २) मिराबाई सुर्यभान राऊत वय ६१ वर्षे, धंदा शेती, रा. वाळुज ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) हिराबाई संतराम देवढे, वय ५८ वर्षे, धंदा शेती रा. वडवाळी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन ते वरील ठिकाणी राहतात. अर्जदाराची आई नामे यमुनाबाई हरीभाऊ उर्फ दामोधर तारु ह्या मौजे नेवरगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होत्या, त्या अर्जदार क्र.१ सोबत मजुरीचे कामासाठी छत्रपती संभाजीनगर येथे राहण्यास गेल्या होत्या व त्या तेथेच दिनांक ०४/१२/२०१६ रोजी मयत झालेल्या आहे. मयत यमुनाबाई हरीभाऊ उर्फ दामोधर तारु यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या विरुध्द मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २८/०२/२०२५ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ५/०३/२०२५ रोजीची आहे.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. १२०/२०२५

अर्जदार : १) शेकनाथ द्वारकादास नवले, वय. ६३ वर्षे, धंदा, शेती, रा. अकोली वाडगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) आसराबाई द्वारकादास नवले, वय ८५ वर्षे, धंदा, शेती, रा. अकोली वाडगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. जी. बी. चव्हाण व ॲड. एस. एस. बनसोड यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, द्वारकादास यादव नवले हे दि. ०७/११/२०२४ रोजी मौजे अकोली वाडगांव ता. गंगापूर येथे मयत झालेले आहे. अर्जदार क. १ व २ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे द्वारकादास यादव नवले यांना अर्जदार क. १ हा मुलगा असून अर्जदार क. २ ही पत्नी आहे या व्यतिरिक्त मर्यंत द्वारकादास यादव नवले यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ व २ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप / उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रकरणात पुढील तारीख २०/०३/२०२५ करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :– २८/०२/२०२५

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# वरखेडी खृ ठाणा ग्रृप सरपंच पद अपात्र

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि १ वरखेडी खुर्द-ठाणा ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच पद अपात्र करण्याचे मा.जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश.

वरखेडी खुर्द-ठाणा ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच बेबी कलीम सय्यद यांनी त्यांच्या मिळकत क्र.६१,६२ व ६३ या मिळकतीवर बेकायदेशीर अतिक्रमण केले असल्या बाबत ग्रामपंचायत सदस्य दीपकसिंग राजपूत यांनी गटविकास अधिकारी सोयगाव यांच्याकडे तक्रार दाखल केली होती.त्यानुसार गटविकास अधिकारी यांनी चौकशी अहवाल व पंचनामा करून सरपंच बेबी कलीम सय्यद यांची सासू व पती यांनी बेकायदेशीर जमिनीवरती अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले.त्यानुसार तो अहवाल मा.जिल्हाधिकारी (छत्रपती संभाजीनगर) यांच्या कडे दाखल केला गेला.तक्रारदार यांच्या वतीने ड.भरत एस.डोईफोडे यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ (१) ज ३ आन्वये हे प्रकरण दाखल केले होते. त्या अनुषंगाने मंगळवार (दि.२५) मा. जिल्हाधिकारी यांनी पटलावरचा पुरावा व युक्तिवाद लक्षात घेऊन वरखेडी खुर्द-ठाणा ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच पद अपात्र ठरवून रिक्त घोषित केले आहे.

# फर्दापूर परिसरात १२.२५ कोटींच्या विविध विकास कामांचे सत्तार यांच्याहस्ते भूमिपूजन



तभा.वृत्तसेवा


सोयगाव,दि.१ मार्च

बहुप्रतिक्षीत व फर्दापुर परिसरातील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वकांक्षी असलेल्या फर्दापुर येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची हायटेक सुविधा असलेली ईमारत लवकरच उभी राहील असे स्पष्ट करीत फर्दापूर येथे डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी वाढीव ५ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करा यासाठी शासनाकडून मंजुरी व निधी मिळवून देवू अशी ग्वाही माजीमंत्री,आमदार अब्दुल सत्तार यांनी सोयगाव तालुक्यातील फर्दापूर येथे बोलताना दिली.फर्दापूर येथे आरोग्य केंद्राच्या इमारतीचे काम पूर्ण होताच येथे अत्याधुनिक आरोग्याच्या दृष्टीने हायटेक सुविधा व त्याप्रमाणात आरोग्य कर्मचारी उपलब्ध असतील असे सांगत फर्दापूर व परिसरात विकास कामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही असे देखील आ. अब्दुल सत्तार म्हणाले.आ.अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने फर्दापूर येथे मंजूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत व कर्मचारी निवासस्थान - ६ कोटी २५ लाख, फर्दापूर येथील विश्रामगृह बांधकाम करणे - ३ कोटी, अजिंठा लेणी - फर्दापुर गावअंतर्गत ते हेलीपॅड रोड सिमेंट काँक्रेटीकरण रस्ता करणे - १ कोटी, रा.मा. २४ ते फर्दापुर गावअंतर्गत सिमेंट काँक्रेटीकरण रस्ता करणे १ कोटी, राष्ट्रीय महामार्ग ७५३ ते फर्दापुर (सराई) सिमेंट काँक्रेटीकरण रस्ता करणे - १ कोटी असे एकूण १२ कोटी २५ लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व ७५ लाख रुपये किंमतीच्या बस स्थानकाचा लोकार्पण सोहळा आ.अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाला. भूमिपूजन सोहळा निमित्त येथील चौक परिसरात आ. अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत सभा पार पडली. याप्रसंगी मार्गदर्शन करीत असताना आ. अब्दुल सत्तार बोलत होते.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव पा. तायडे, उपसभापती दारासिंग चव्हाण,माजी उपनगराध्यक्ष विनोद मंडलेचा, सयाजीराव वाघ,माजी सभापती धरमसिंग चव्हाण , खालेक पटेल,न.प.तील शिवसेना गटनेता अक्षय काळे, शिवसेना शहर प्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे,युवा सेनेचे कुणाल राजपूत,उस्मान खा पठाण,विलास वराडे, बंडू काळे आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमास पंपिंद्रसिंगपाल वाय टी,सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता अजय टाकसाळे, शाखा अभियंता नितीन राठोड, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता अशोक शाखावर ,शाखा अभियंता दीपक मोगडे,राजेश राजगुरु,तालुका आरोग्य अधिकारी डॉ. हितेश छाबडा वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाखा डुकरे यांच्यासह सुरेखाताई तायडे,अशोक देशमुख,गणेश वाघ, गजानन चाथे,फिरोज पठाण,रवींद्र बावस्कर,विजू तायडे, कॅप्टन मकसूद कादरी,भीमा बोराडे,शेख मुख्तार,शेख जाकीर,उस्मान खा पठाण,नामदेव सोन्ने,सलीम खा पठाण, पांडुरंग थोरात,रंगनाथ वराडे,अझहर शेख,इमरान शहा, हर्षल काळे,राधेश्याम जाधव,भारत तायडे,अनिस खा पठाण,गजानन कुडके,छोटूसिंग राजपूत आदिंसह फर्दापूर व परिसरातील गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (५५) दुःखाश्रू

अन्यायाशी संघर्ष हा डॉक्टरांचा स्वभाव होता व कष्टासी मानू झोला मृत्यूशी खेळू खेळा असे त्यांचे मनोधैर्य होते. त्यांनी असहकार आंदोलनात भाग घेतला होता. असहकारावर डॉक्टर ठिकठिकाणी व्याख्यान देत असत. तेव्हाच खिलाफत चळवळ पण सुरू होती. (वाचाअलक ४७) असहकारावर राष्ट्रद्रोही व्याख्यान या सबबीखाली त्यांना एक वर्ष कारावास झाला. १९ ऑगस्ट १९२१ ला डॉक्टर नागपूरच्या कारागृहात गेले. १२ जुलै १९२२ ला मुक्त झाले. परंतु त्याच काळात मलबारातील मुसलमानांनी बंड केले होते. त्यावर स्वा. सावरकरांनी मोपल्याचे बंड अर्थात मला काय त्याचे ही कादंबरी १९२६ मध्ये लिहिली. केरळमधील मलबारातील मोपला मुसलमानांनी अनन्वित अत्याचार केले होते. मोपल्यांच्या बंडात १५०० हिंदू बळी पडले होते व वीस सहस्त्र हिंदूंना सक्तीने बाटवले होते. त्या काळात मालमत्तेची हानी तीन कोटी रुपये झाली होती. डॉक्टर हेडगेवार पुस्तक वाचत होते, तेव्हा अक्षरशः दुःखाश्रूंना त्यांच्या डोळ्यांनी वाट मोकळी करून दिली होती. कारण बंडाच्या वेळी ते कारागृहात होते. आणि तरीसुद्धा महात्मा गांधी म्हणत होते हा मोपल्यांचा धार्मिक झगडा होता; तसे ते देवभोळे असतात. हे वाचून तर डॉक्टरांनी स्वतःच्या डोक्यावर हात मारला. क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## रिन्यूएबल एनर्जी क्षेत्रात १७०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची घोषणा

मुंबई : सौर पंप आणि मोटर्सची आघाडीची उत्पादक आणि पुरवठादार शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेडने आज मध्य प्रदेशात १७०० कोटी रुपयांच्या महत्त्वपूर्ण गुंतवणुकीची घोषणा केली. पिथमपूरमधील सुमारे ६४ हेक्टर औद्योगिक जमिनीवर होणाऱ्या या विस्तारामुळे रिन्यूएबल एनर्जी सोलर वेफ़र सेसोलर सेल, सोलरपंपिंग सिस्टम आणि इलेक्ट्रिक वाहन घटकांसाठी अत्याधुनिक उत्पादन युनिट्सची स्थापना होईल, ज्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतील. या प्रकल्पांमध्ये उत्पादन सुरू झाल्यानंतर, शक्ती पंप ही देशातील पहिली कंपनी असेल जी पंप, मोटर्स, सौर पॅनेल, स्ट्रक्चर्स, व्हीएफडी, इन्व्हर्टर इत्यादी सौर पंपिंग उद्योगाच्या सर्व गरजा पूर्ण करण्याची क्षमता ठेवेल. १९८२ मध्ये स्थापित, शक्ती पंप्सचा भारतीय बाजारपेठेत ४० वर्षांहून अधिक काळाचा समृद्ध वारसा आहे. कंपनी वेगवेगळ्या गरजा पूर्ण करण्यासाठी घरगुती, कृषी, औद्योगिक, सौर आणि सांडपाणी पंपांसह विस्तृत श्रेणीतील पंप ऑफर करते.

## एनडीटीव्ही मराठी एंटरटेन्मेंट अॅवॉर्ड्सच्या झगमगत्या सोहळ्यात मनोरंजन क्षेत्रातल्या स्टार्सची मांदियाळी

मुंबई : एनडीटीव्ही मराठी एंटरटेन्मेंट अॅवॉर्ड्स २०२५च्या पहिल्या पर्वाची सांगता अत्यंत दिमाखात झाली. मराठी चित्रपट, टेलिव्हिजन आणि ओटीटी अशा सर्व माध्यमांमधली दिग्गज, द्रष्टी आणि नव्या वाटा धुंडाळणारी व्यक्तिमत्त्वं या झगमगत्या सोहळ्यात सहभागी झाली होती. मराठी मनोरंजन उद्योगाच्या भविष्याला आकार देणारी प्रतिभा आणि सर्जनशीलता यांना मानवंदना देणारा हा मराठी मनोरंजन क्षेत्रातला अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार सोहळा ठरला. एनडीटीव्ही मराठीचा हा पहिलाच पुरस्कार सोहळा एकदम भव्यदिव्य आणि दिमाखदार होता. मुंबईतल्या ताज लँड्स एंड या पंचतारांकित हॉटेलमध्ये झालेला हा सोहळा अगदी खास असल्याची, तसंच हा पुरस्कार आपल्यासाठी विशेष असल्याची भावना सर्वच पुरस्कारविजेत्यांनी व्यक्त केली. या वैशिष्ट्यपूर्ण सोहळ्याची चर्चा संपूर्ण मराठी मनोरंजनविश्वात होत आहे.या पुरस्कार सोहळ्याने मनोरंजन क्षेत्रातली दिग्गज व्यक्तिमत्त्वं, उदयोन्मुख कलावंत आणि कंटेट क्रिएटर्स (आशयनिर्माते) अशा सर्वांनाच मराठी मनोरंजन क्षेत्राचं क्षितिज विस्तारण्यातलं त्यांचं योगदान लक्षात घेऊन एकत्र आणलं. नामवंत ज्युरींच्या नेतृत्वाखाली राबवण्यात आलेल्या कस पाहणाऱ्या निवडप्रक्रियेतून फिल्म, टेलिव्हिजन आणि डिजिटल कंटेंट अशा सर्व माध्यमांतल्या विविध श्रेणींमधून पुरस्कारविजेत्यांची निवड करण्यात आली. कथनाच्या सर्व प्रकारच्या माध्यमांमधल्या प्रतिभेची दखल घेतली जावी, असा उद्देश त्यामागे होता.

## वसुधा वसंतराव चौधरी यांचे निधन



छत्रपती संभाजी नगर मधील बन्सीलालनगर येथील रहिवासी श्रीमती वसुधा वसंतराव चौधरी (वय ७६) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने बुधवार दि.२६/०२/२५ रोजी पहाटे माया नगर सिडको येथे मुलीच्या घरी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मुकुंदवाडीच्या स्मशानभूमीत दि. २६.२.२५ रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.बन्सीलाल नगर येथील वकील कै.वसंतराव चौधरी यांच्या त्या पत्नी होत्या.सध्या सिडको येथे वास्त्यव्यास होत्या व त्यांच्या पश्चात दोन मुली,जावई, नातवंडे असा परिवार आहे. बजाज ऑटो मधील अभिजीत देशपांडे यांच्या त्या सासू होत.

# डॉ. प्रमोद पवार यांच्या ट्रान्स-डिकंस्ट्रक्शन थिअरी ऑन मोनिझम आणि थिअरी ऑफ इंटरप्रिटेशन्स संशोधन पद्धतींचा शोध, एआय चा स्वीकार



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१ मार्च

डॉ.प्रमोद अंबादासराव पवार यांच्या ट्रान्स-डिकंस्ट्रक्शन थिअरी ऑन मोनिझम आणि थिअरी ऑफ इंटरप्रिटेशन्स संशोधन पद्धतींचा शोध, -ख चा स्वीकार

सिल्लोड, छत्रपती संभाजीनगर - इंद्रराज कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड यांनी नुकतेच दि.२८ शुक्रवार रोजी संशोधन पद्धती एक आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे यशस्वी आयोजन केले. महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने (खट-उ) आयोजित केलेल्या या कार्यक्रमात संपूर्ण विभागातील शिक्षणतज्ज्ञ आणि संशोधक सहभागी झाले होते.या चर्चासत्रातील प्रमुख आकर्षण म्हणजे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथील खट-उ समन्वयक, संशोधन मार्गदर्शक आणि इंग्रजी विभागप्रमुख डॉ.प्रमोद अंबादासराव पवार यांचे प्रमुख भाषण.डॉ.पवार यांनी समकालीन संशोधन पद्धतींच्या अंतर्दृष्टीपूर्ण अन्वेषणाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.त्यांनी विशेषतः त्यांच्या ट्रान्स-डिकंस्ट्रक्शन थिअरी ऑन मोनिझम आणि थिअरी ऑफ इंटरप्रिटेशन्स या शैक्षणिक चौकशीसाठी शक्तिशाली साधने म्हणून लक्ष केंद्रित केले.

डॉ.पवार यांनी संशोधनातील कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) साधनांच्या परिवर्तनीय क्षमतेवर जोर दिला. त्यांनी विशेषतः ॠशाळपळ, उहरींॠझढ आणि ऊशर्शीशिशज्ञ यांच्या क्षमतेवर चर्चा केली, ज्यामुळे संशोधन प्रक्रिया सुलभ करणे, जटिल डेटाचे विश्लेषण करणे आणि नवीन अंतर्दृष्टी निर्माण करणे शक्य आहे.त्यांनी संशोधकांना या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याचे आवाहन केले, ज्यामुळे त्यांच्या कार्याची कार्यक्षमता आणि परिणामकारकता वाढवता येईल.

या चर्चासत्रात उद्घाटन समारंभ देखील आयोजित करण्यात आला होता, ज्यात अजंठा शिक्षण आणि सैन्य तयारी संस्थेचे सचिव माननीय अशोक देवरे आणि प्रतिष्ठान महाविद्यालय,पैठण येथील रसायनशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.अजय पाटील यांनी हजेरी लावली होती. समारोप समारंभाचे अध्यक्षस्थान यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,सिल्लोड येथील वाणिज्य विभागाचे प्राध्यापक डॉ.डी.आर.पानझाडे आणि महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रा.आर.एच.बलरावत यांनी भूषवले.प्रा.डॉ. व्ही.बी.लांब,प्रभारी प्राचार्य आणि मुख्य आयोजक यांनी या चर्चासत्राच्या यशस्वीतेत महत्त्वाची भूमिका बजावली.प्रा.डॉ.संतोष चौठाईवाले, खट-उ समन्वयक यांनी निमंत्रक म्हणून काम पाहिले,तर डॉ. चंद्रकांत देवकते,सहाय्यक खट-उ समन्वयक यांनी आयोजन सचिव म्हणून काम केले.

या चर्चासत्राने संशोधकांना फलदायी चर्चांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि अत्याधुनिक संशोधन पद्धतींवर विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी एक मौल्यवान व्यासपीठ उपलब्ध करून दिले.डॉ.प्रमोद अंबादासराव पवार यांच्या ट्रान्स-डिकंस्ट्रक्शन थिअरी ऑन मोनिझम आणि थिअरी ऑफ इंटरप्रिटेशन्स आणि -ख साधनांवर लक्ष केंद्रित केल्याने शैक्षणिक चौकशीच्या विकसित होत असलेल्या परिदृश्यासाठी संशोधकांना तयार करणारा एक दूरदर्शी दृष्टिकोन दर्शविला.या कार्यक्रमाचे त्याच्या अंतर्दृष्टीपूर्ण सादरीकरणासाठी आणि संशोधन उत्कृष्टतेची संस्कृती वाढवण्याच्या योगदानासाठी मोठ्या प्रमाणावर कौतुक झाले.

## स्वयंम शिक्षण प्रयोग संस्थेच्या उपक्रमांतर्गत सिल्लोड येथील ५० गावांमधील सखींचे २ दिवसीय प्रशिक्षण यशस्वी



सिल्लोड : स्वयंम शिक्षण प्रयोग ही संस्था तळागाळातील महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्रासह देशभरातील विवीध राज्यांत काम करते. पर्यावरण पुरक शेती, उद्योजकता, स्वच्छ्ता, आरोग्य व पाणी, तसेच ऊर्जा आणि महीला नेतृत्व विकास या विषयांवर लक्ष केंद्रीत करत मागील दोन दशकांपेक्षा जास्त कालावधी पासुन कार्यरत आहे.

महिलांच्या पुढाकारातुन पर्यावरण

पुरक शेती (थउठऋ) हा प्रकल्प छत्रपती संभाजीनगर व परभणी जिल्ह्यामधील १०० गावांमधे नव्याने चालू होत आहे. या प्रकल्पाचे मुख्य घटक हे सेंद्रीय शेती, उद्योजकता व शेतीपूरक व्यवसाय, पाणी व्यस्थापन व शासकीय योजना जोडणी हे आहेत.

छ. संभाजीनगर जिल्ह्यामधील सिल्लोड तालुक्यातील ५० गावांमध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पासाठी गावपातळीवर काम करण्यासाठी निवड केलेल्या सखींसाठी दोन दिवशीय प्रशिक्षण सत्र दि. २० आणि २१ फेब्रुवारी २०२५ रोजी यशस्वीरीत्या संपन्न झाले. ह्या दोन दिवसीय प्रशिक्षणामध्ये सखींना संस्थेबद्दल महिती, प्रकल्पाबद्दल माहिती तसेच सेंद्रीय शेती, उद्योजकता व पाणी व्यवस्थापन अशा विविध विषयांवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

स्वयंम शिक्षण प्रयोग संस्थेचे संचालक श्री. उपमण्यु पाटील, नसीम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प व्यवस्थापक सम्राट कसबे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन करुन उपस्थित ५० गावांतील महीला प्रतिनिधींना मार्गदर्शन केले, यावेळी प्रमुख मार्गदर्शक वैशाली घुगे यांसह तालुका समन्वयक शुभम कुमावत व शामभवी सोनटक्के उपस्थित होते.

## शिक्षणाबरोबर खेळाला प्राधान्य द्या - मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद (आबा) पाटील

शिर्डी, दि.१ - खेळामुळे शरीर व मन तंदुरुस्त रहात असल्याने विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच खेळालाही प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद (आबा) पाटील यांनी केले. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅण्ड इंजिनिअरींग (पॉलिटेक्निक), प्रवरानगर या संस्थेच्या वार्षिक स्नेहसंमेलन व क्रीडा पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक अण्णासाहेब म्हस्के पाटील, माजी आमदार नितीन भोसले, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुश्मिता विखे पाटील, लॉर्सन अॅण्ड टुर्ब्राचे उपाध्यक्ष अरविंद पारगावकर, पद्मश्री डॉ .विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्यांचे अध्यक्ष कैलास तांबे पाटील आदी उपस्थित होते.

# बलात्काराच्या गुन्ह्यांना फाशीचीच शिक्षा हवी

### भारतीय स्त्री शक्ती जागरण संस्थेची मागणी; मुख्यमंत्र्यांना ९ मागण्यांचे निवेदन



पुणे, दिनांक १ मार्च : स्वारगेट बस स्थानकावरील बलात्काराची घटना अत्यंत संतापजनक असून, बलात्काराच्या गुन्ह्यांना फाशीचीच शिक्षा हवी, अशी मागणी भारतीय स्त्री शक्ती जागरण संस्थेच्या माध्यमातून पुणे शहरातील महिलांनी मुख्यमंत्र्यांना केली आहे.

शनिवारी यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत मातृशक्तीने आपला निषेध आणि आक्रोश तीव्र शब्दांत व्यक्त केला. महिलांची सुरक्षा आणि न्यायिक प्रकरणांच्या कठोर उपाययोजनांसाठी नऊ मागण्यांचे निवेदन यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. ज्यामध्ये फाशीच्या शिक्षेच्या मागणीबरोरच अत्याचारांच्या घटनंत एक महिन्यात न्याय, सार्वजनिक ठिकाणी पोलिस गस्त, पेट्रोलिंग व्हॅनमध्ये महिला कर्मचारी, सार्वजनिक ठिकाणी पुरेशी प्रकाश व्यवस्था आणि सीसीटीव्ही कॅमेरे, स्वच्छतागृहांत महिला व्यवस्थापिका, पोलिस ठाण्यांत महिला सुरक्षा कक्ष आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. राज्य शासनाने याची तातडीने दखल घेत कारवाई करावी, अशी आग्रही मागणी भारतीय स्त्री शक्ती जागरण संस्थेच्या वतीने करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्ष कीर्ती देशपांडे यासह मृणालिनी दातार, मेधा वैशंपायन, प्रज्ञा अग्निहोत्री, अनिता टेकवडे, प्रिया रसाळ, निलाक्षी गोडबोले, रंजना खरे, स्वाती टिळक, अनघा बिनीवाले,आशा साने, अपर्णा पाटील, प्रार्थना रसाळ,,संपदा खोले, आदी उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकर यांनी हे निवेदन स्विकारले.

# नॉइज-इंड्युस्ड हिअरिंग लॉस खूप उशीर होण्यापूर्वी तुमच्या श्रवणशक्तीचे संरक्षण करा : डॉ. डॉ. शरद शेळके



छत्रपती संभाजीनगरमधील ४२ वर्षीय टेक प्रोफेशनल असलेल्या रवीने कधीही कल्पना केली नव्हती की त्याच्या दैनंदिन सवयी-लांब ब्लूटूथ कॉल, वीकेंडला बाईक चालवणे आणि शहरातील गोंगाटामुळे ऐकणे कमी होईल. त्यांची ही स्थिती, ध्वनी-प्रेरित श्रवणशक्ती कमी होणे (छखक्ष), दक्षिण आणि पश्चिम भारतातील, विशेषतः हैदराबाद, पुणे, मुंबई आणि बंगळुरूमध्ये, जिथे ध्वनी प्रदूषण चिंताजनकपणे जास्त आहे, हजारो लोकांना प्रभावित करत आहे.

बदलत्या मानसिकते: सर्वांसाठी कान आणि श्रवणशक्तीची काळजी प्रत्यक्षात आणण्यासाठी स्वतः ला सक्षम करा! या थीमसह, या जागतिक श्रवण दिनाने आपल्याला आपल्या श्रवणशक्तीवर नियंत्रण ठेवण्याचे आवाहन केले आहे. नॉइज-इंड्युस्ड हिअरिंग लॉस हा श्रवणशक्ती कमी होण्याच्या सर्वात प्रतिबंधित प्रकारांपैकी एक आहे, तरीही हेडफोनचा जास्त वापर, औद्योगिक आवाज आणि मोठ्या आवाजाच्या वातावरणात अनियंत्रित संपर्कामुळे ते वाढत आहे.

अभ्यासातून असे दिसून आले आहे की व्यावसायिक संपर्क आणि जीवनशैलीच्या निवडींमुळे ३० आणि ४० च्या दशकातील पुरुषांना सर्वाधिक त्रास होतो, तर शहरी भागातील वृद्ध लोकसंख्या दीर्घकालीन आवाजाच्या नुकसानास बळी पडते. तरीही, बरेच लोक श्रवणशक्ती कमी होणे ही एक किरकोळ गैरसोय म्हणून नाकारतात - जोपर्यंत संभाषण कठीण होत नाही आणि सामाजिक संवादांना त्रास होत नाही.

लवकर कृती का महत्त्वाची

श्रवणशक्ती कमी होणे अपरिवर्तनीय आहे परंतु टाळता येण्याजोगे आहे. हेडफोनचा आवाज कमी करणे, मोठ्या आवाजाच्या वातावरणात आवाज संरक्षण वापरणे आणि नियमित श्रवण चाचण्या शेड्यूल करणे यासारखे साधे बदल श्रवणशक्ती टिकवून ठेवण्यास मदत करू शकतात.

मेडिकोव्हर हॉस्पिटल्समध्ये, आम्ही प्रगत ऑडिओमेट्री, वैयक्तिकृत श्रवण संरक्षण आणि तज्ञांच्या हस्तक्षेपाद्वारे लवकर ओळखण्यावर लक्ष केंद्रित करतो, ज्यामुळे धोका असलेल्या रुग्णांसाठी चांगले परिणाम सुनिश्चित होतात.

तुमची श्रवणशक्ती मौल्यवान आहे - तुम्हाला ऐकायला लावण्यासाठी शांततेची वाट पाहू नका. जर तुम्हाला कान वाजणे, संभाषण ऐकण्यात अडचण येणे किंवा गोंगाटाच्या वातावरणात अस्वस्थता येत असेल, तर आजच तज्ञांचा सल्ला घ्या.

आताच कृती करा - कारण एकदा गमावले की, श्रवणशक्ती कधीही परत येऊ शकत नाही.

# स्वर स्वामी कला साधना ग्रुप तर्फे जागर मराठीचा



मराठी राजभाषा दिन म्हणजेच कविवर्य कुसुमाग्रज विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्म दिवस संपूर्ण महाराष्ट्रात २७ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो.यात दुग्ध शर्करा योग म्हणजेच नुकताच केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला.

मराठी राजभाष दिनाचे औचित्य साधून स्वर स्वामी कला साधना ग्रुप तर्फे सायन येथील गोकुळ हॉल येथे सदाबहार मराठी गीतांचा कार्यक्रम आयोजित केला होता.

या ग्रुप चे ऑर्गनायझर सौं. प्रियांका हातगे,कु. सौरभ हातगे यांनी हितचिंतक गणेश हातगे राजेश हुनारी यांच्या साथीने अनेक नवख्या लहान मोठ्या गायकांना सोबत घेऊन अप्रतिम असा कार्यक्रम सादर केला.

या कार्यक्रमाला विविध मान्यवर कलाकारांनी उपस्थिती दर्शवली. त्यातील विशेष उल्लेखनीय उपस्थिती म्हणजे मराठी करा ओके गीतांचे ग्राफ मास्टर ज्यांच्या मार्गदर्शना खाली अनेक नवोदित कलाकार घडले असे सुनील मांजरेकर साहेब. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्र संचालन सौं. तन्वी बनसोडे यांच्या निवेदनाने झाले. चल चित्रण श्री चरण रनोत्रा यांनी केले. स्वर स्वामी कला साधना ग्रुप म्हणजे एक कुटुंबच आहे.महानगर पालिका कर्मचारी दिवसभर काम करून थोडा स्वतःसाठी वेळ काढून ही स्वर साधना करतात हे खरेच वाखाणण्या जोगे आहे.या दिवशी श्री. सावंत यांचा वाढदिवस व डॉ. रंजना यांच्या लग्नाचा वाढदिवस सर्वांनी आनंदाच्या वातावरणात साजरा केला.हरहुन्नरी कलाकारांच्या गायनाने कार्यक्रमांची शोभा वाढवली वं कार्यक्रमांस चार चांद लावले.

## दिल्ली येथे सोयगाव शहरातील कवी माणिक सोनवणे यांचा सत्कार



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१ मार्च

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सरहद पुणे-दिल्ली आयोजित ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २३ फेब्रुवारी २०२५ रोजी, छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी तालकटोरा स्टेडियम न्यू दिल्ली येथे ऐतिहासीक रूपाने पार पडले. स्वागताध्यक्ष शरदचंद्रजी पवार तर प्रमुख पाहुणे देवेंद्रजी फडवणीस,तर संमेलन अध्यक्षा प्रा.ताराबाई भवाळकर ह्या लाभलेल्या होत्या.

या दिल्ली येथे झालेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कवी माणिक सोनवणे यांना आमंत्रित करून त्यांचा सत्कार करण्यात आला.कवी माणिक सोनवणे हे तालुका सोयगांव जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील रहेवाशी आहेत,ते त्यांच्या गावबोली भाषेत ग्रामीण साहित्य लिहीत असतात,आणि साहित्य संमेलनाच्या व्यास पिठावर कवितेचे गाऊन सादरीकरण करत असतात.

अशीच त्यांच्या गावबोली भाषेतील पाऊसपाणी नावाच्या ग्रामीण कवितेची निवड अ.भा.मराठी साहित्य मंडळाने केली होती.

## अग्रलेख...

# नौटंकीबाज केजरीवाल आणि आपचे आमदार

दिल्लीत आम आदमी पक्षाला जनतेने सत्तेवरून पायउतार केल्यानंतरही या पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल, माजी मुख्यमंत्री आतिशी तसेच पक्षाच्या अन्य नेत्यांचे डोळे उघडत नाही, याचे आश्चर्य वाटते. हे सर्व नेते बावचळल्यासारखे दिसत आणि वागतही आहेत. केजरीवाल आणि त्यांचा पक्ष हीच मोठी नौटंकी आहे. सुरुवातीला वेगवेगळ्या प्रकारची नौटंकी करून या लोकांनी दिल्लीच्या जनतेच्या डोळ्यात धूळ झोकली. यातून जवळपास १० वर्षे दिल्लीत सत्ता उपभोगली. केजरीवाल आणि त्यांच्या भ्रष्ट मंत्र्यांनी सत्तेचा आनंद लुटला, असे म्हणण्यापेक्षा दिल्लीला लुटले, असे म्हणणे जास्त योग्य ठरेल. त्यामुळे केजरीवाल आणि आपचे नेते म्हणजे अलिबाबा आणि चाळीस चोरसारखे आहेत. या अलिबाबाने आणि त्यांच्यासोबतच्या चाळीस नाही तर साठावर चोरांनी १० वर्षांत पूर्ण दिल्ली लुटली. दिल्लीची तिजोरी खऱ्या अर्थाने रिकामी केली. केजरीवाल आणि आपच्या अन्य नेत्यांची वागणूक आतापर्यंत जगातील कोणतीही शक्ती आपल्याला सत्तेवरून खाली खेचू शकत नाही, सत्तेचा अमरपट्टा घेऊन आपण आलो, अशी बेमुर्वतखोरीची होती. पण नुकत्याच झालेल्या दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत जनतेने त्यांना नुसता धडाच शिकवला नाही तर त्यांची लायकीही दाखवून दिली. पराभवानंतर केजरीवाल आणि आपच्या नेत्यांनी जनतेचा हा कौल मोठ्या मनाने स्वीकारायला पाहिजे होता, आपल्या पराभवाचे आत्मचिंतन करायला पाहिजे होते. दिल्लीच्या जनतेने सलग दोनदा आपल्याला प्रचंड बहुमताने निवडून दिले, मग यावेळी असे काय झाले, त्याच जनतेने आपला निवडणुकीत पराभूत केले. याचे कारण केजरीवाल आणि अन्य आप नेत्यांनी शोधायला पाहिजे होते, पण तसे न करता केजरीवाल आणि अन्य नेते कारण नसताना रस्त्यावर उतरत आपल्या नकारात्मक मानसिकतेचे दर्शन घडवत आहेत. कारण नसताना आक्रस्ताळेपणा करीत आहेत. आक्रमकता आणि आक्रस्ताळेपणा यातील सीमारेषा खूप धूसर असते, आक्रमकता कुठे संपते आणि आक्रस्ताळेपणा कधी सुरू होतो, हे भल्याभल्यांना समजत नाही. आज आपच्या नेत्यांमध्येही हेच सुरू आहे. मुळात कोणताही विजय हा जसा अंतिम नसतो, तसा पराभवही अंतिम नसतो. निवडणुकीतील विजयाचे रहाटगाडगे कधी हार तर कधी जीत याप्रमाणे सुरू असते. त्यामुळे विजयाने जसे उन्मत्त व्हायचे नसते, तसेच पराभवाने निराशेच्या अंधकारात पडायचेही नसते. जनतेने दिलेला कौल मोठेपणाने मान्य करत जनतेने दिलेली विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी आपने प्रामाणिकपणे पार पाडायला पाहिजे. पण तसे न करता आपचे नेते विनाकारण भाजपाला घेरत आहेत, नको ते मुद्दे उचलत आपल्याच मूर्खपणाचे प्रदर्शन करीत आहेत. विरोधी पक्ष म्हणून आपला सरकारवर टीका करण्याचा अधिकार आहे. सरकार चुकत असेल तर आपने मंत्री आणि मुख्यमंत्र्यांची कानउघाडणीही करायला हरकत नाही. पण त्यासाठी नव्या मंत्र्यांना आणि मुख्यमंत्र्यांना आपले काम समजून घेऊ दिले पाहिजे, थोडे स्थिरस्थावर होऊ दिले पाहिजे. भाजपाच्या दिल्लीतील नव्या मंत्र्यांना अगदी मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांना कोणताही प्रशासकीय अनुभव नाही, हे जगजाहीर आहे. पण आज जी रेखा गुप्ता आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील अर्धा डझन मंत्र्यांची उणी बाजू वाटत असली, तरी हीच उद्या त्यांची जमेची बाजू ठरणार आहे.

दिल्लीत यावेळी भाजपाचे ४८ तर आपचे फक्त २२ आमदार निवडून आले. पण १० वर्षे सलग सत्तेवर राहूनही आपच्या आमदारांना विधानसभेत कसे वागायचे ते समजत नाही, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. भाजपाच्या राज्यातील नव्या सरकारने जे केलेच नाही, त्याचे खापरही आपचे हे दिवटे आमदार मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि त्यांच्या सरकारवर फोडत आहेत. यातून दोन समाजात संघर्ष निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो. भाजपाच्या नव्या सरकारने सर्व मंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हुतात्मा भगतसिंग यांच्या प्रतिमा हटवल्या, असा पूर्णपणे खोडसाळ आरोप अल्पकाळासाठी का होईना, मुख्यमंत्री राहून चुकलेल्या आणि आता विरोधी पक्षनेते असलेल्या असलेल्या आतिशी यांनी केला. प्रत्यक्षात भाजपाने या दोन महापुरुषांच्या प्रतिमा हटवल्या नाही तर या दोन महापुरुषांसोबत राष्ट्रपिता महात्मा गांधी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमा दिल्लीच्या मंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात लावल्या. राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांच्या प्रतिमा सर्व सरकारी कार्यालयात लावणे हा राजशिष्टाचाराचा भाग आहे. कारण राष्ट्रपती आणि पंतप्रधान हे कोणत्याही पक्षाचे नसतात तर देशाचे असतात. महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रपती आणि पंतप्रधान ही दोन पदे पक्षीय राजकारणाची नसतात, तर घटनात्मक असतात. खरं म्हणजे दिल्लीत केजरीवाल यांचे सरकार असताना दिल्ली सरकारच्या सर्व कार्यालयांत त्यांनी राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांची छायाचित्रे लावायला पाहिजे होती. त्यावेळी केजरीवाल सरकारने जाणीवपूर्वक केलेली चूक रेखा गुप्ता यांच्या सरकारने दुरुस्त केली तर त्यात आकाशपाताळ एक करण्याचे कारण नाही. या मुद्यावरून विधानसभेत धुडगूस घालण्याचे तर काही कारण नव्हते. पण तेवढे भान आपच्या आमदारांना ठेवता आले नाही. त्याची परिणती साहजिकच त्यांच्या निलंबनात झाली. विरोधी पक्षनेत्या आतिशी यांच्यासह आपच्या २२ पैकी २१ आमदारांना तीन दिवसांसाठी निलंबित करण्यात आले. आपचे एक आमदार अमानुल्लाह खान यातून बचावले, म्हणजे निलंबित झाले नाहीत. याचा अर्थ ते खूप नीतिनियम आणि कायदा पाळणारे होते, असे नाही, तर दुसऱ्या गुन्ह्यात ते तुरुंगात होते, हे त्याचे खरे कारण आहे. दिल्ली विधानसभेच्या पहिल्याच अधिवेशनात नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांचे भाषण सुरू असताना आपच्या आमदारांनी घोषणाबाजी करत त्यांना भाषण करणे कठीण करून टाकले. आपल्या कृतीने त्यांनी नायब राज्यपालांचाच नाही तर एकप्रकारे दिल्लीच्या जनतेचाही अपमान केला. आपच्या आमदारांची विधानसभेतील जी कृती होती, ती अतिशय आक्षेपार्ह अशी म्हणावी लागेल. त्यामुळे त्यांना तीन दिवसांसाठी निलंबित करणे, ही अतिशय छोटी शिक्षा झाली असे म्हणावे लागेल. या सर्व आमदारांना खरं तर वर्षभरासाठी निलंबित केले पाहिजे. आपच्या निलंबित आमदारांनी विधानभवन परिसरात घुसण्याचा प्रयत्न केला, पोलिसांनी त्यांना रोखले तर ते तेथे धरण्यावर बसले. भाजपा सरकारवर हुकूमशाहीचा आरोप करीत आतिशी यांनी राष्ट्रपतींना पत्र पाठवत भेटीची वेळ मागितली. हा सारा प्रकार म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा असा म्हणावा लागेल. आपण काय करतो, कसे वागतो, याचे भान केजरीवाल आणि आपच्या अन्य नेत्यांना राहिले नाही, असे म्हणावेसे वाटते. मुळात विरोधी पक्षनेत्या म्हणून आतिशी यांना भाजपाच्या मंत्र्यावर आणि मुख्यमंत्र्यावर टीका करण्याचा अधिकार आहे, तो त्यांचा अधिकार कोणी नाकारू शकत नाही, पण या अधिकाराचा वापर आतिशी यांनी तर्कसंगतपणे करायला पाहिजे. आपच्या आमदारांच्या विधानसभेतील कृतीचे वर्णन नंगा नाच याच एकाच शब्दात करावे लागेल.

मुळात केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून संयमाची आणि शिष्टाचाराची अपेक्षा करता येत नाही. संयम आणि शिष्टाचार तसेच केजरीवाल यांचा दूरदूरपर्यंत काही संबंध नाही. केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांची वागणूक ही नेहमीच अराजकाची असते. आपल्या १० वर्षांच्या राजवटीत त्यांनी दिल्लीत अराजकसदृश परिस्थितीच निर्माण केली. मुख्यमंत्रिपदावर असतानाही केजरीवाल यांना या पदाची मर्यादा आणि प्रतिष्ठा कधी सांभाळता आली नाही. आपल्या कार्यकाळात त्यांनी या पदाची इज्जत पार धुळीस मिळवली. त्यामुळेच दिल्लीच्या मुख्यमंत्र्याकडे पाहण्याचा जनतेचाही दृष्टिकोन बदलला, नव्हे, केजरीवाल यांनी तो बदलण्यास जनतेला आपल्या लोकशाहीविरोधी कृतीने आणि असंसदीय आचरणाने भाग पडले. केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांना अजूनही शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. आडातच नाही तर पोहऱ्यात कसे येणार, असे म्हणावेसे वाटते. केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांची एकूणच वाटचाल ही विनाशकाले विपरीत बुद्धी याप्रमाणे आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# छत्रपतींचे निष्ठावान भक्त स्वातंत्र्यवीर सावरकर

'अनादि मी, अनंत मी' या 'आत्मबल' असे शीर्षक असलेल्या गीताला महाराष्ट्र शासनाचा 'छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत पुरस्कार' दिल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन!

महाराष्ट्र ही संतांची आणि महापुरुषांची भूमी आहे. एखाद्या देशालाही महापुरुषांची इतकी परंपरा लाभत नाही ती आपल्या महाराष्ट्राला लाभली आहे. पण आपले दुर्दैव असे की, आपल्याला ती परंपरा जपता आली नाही. असं म्हणतात की, दक्षिण भारतात प्रांतवादाचं राजकारण खूप मोठं आहे. उत्तर भारतात जातीचं राजकारण मोठं आहे. पण आपल्या राज्यात आपण दुसरं काय केलं. आपण सर्वांनी मिळून सर्व महापुरुषांना जातीत विभागून टाकलं. 'दूषित छद्म पुरोगामी चळवळ' महाराष्ट्रात इतकी जोर धरली की, आपल्या भूमीला महापुरुषांचं वरदान मिळालं होतं; ते आपल्याला घेता आलं नाहीच. उलट आपण त्या वरदानाचं शापात रूपांतर केलं. इतके आपण करंटे आहोत. लक्ष्मण उतेकर या कष्टकरी मराठी माणसाने बॉलिवूडमध्ये नाव कमावलं व 'छावा' हा त्यांचा ड्रीम प्रोजेक्ट नुकताच प्रदर्शित झाला. या चित्रपटातून छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रम भारतासमोरच नव्हे तर जगासमोर आला. आपले थोरले आणि धाकले असे दोन्ही छत्रपती म्हणजे आपला अभिमान, स्वाभिमान, प्राण सगळंच आहेत. आपल्या छत्रपतींचा खरा इतिहास जर आपण जगाला ओरडून सांगितला तर जगातले सगळे योद्धे फिके पडतील. १०० नेपोलियन जरी समोर आले तरी आपले थोरले नि धाकले धनी त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ ठरतील, इतके आपले छत्रपती महान आहेत. पण आपण काय केलं? आपल्याला त्यांची महानता पचवता आली नाही. आपल्यासमोर साक्षात शिव-शंभू उभे असताना आपण आपला स्वार्थ पाहिला आणि आजही आपण आपला स्वार्थ पाहत आहोत. छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यावर ज्यांनी आपली अस्मिता बाटवली, ज्या वाळवंटी विकृतीने छत्रपती संभाजी महाराजांची हत्या केली, ज्याचे गोडवे आजही भारतात गायले जातात त्यांच्याविरुद्ध पेटून उठण्याऐवजी आपण आपापसातच भांडत आहोत. फितुरी कुणी केली यापेक्षा कोणासाठी फितुरी झाली हे जास्त महत्त्वाचं आहे. त्या मूळ शत्रूचे, त्या औरंग्याचे वैचारिक वारस आजही आपल्यात फूट पाडत आहेत आणि हे बेटे सोफ्यावर बसून अंगूर चघळत आहेत. इतिहास अभ्यासक विश्वास पाटील म्हणतात, ''माणसाच्या स्वार्थानेच सर्वांना पागल बनवलं होतं आणि त्यामुळे ही शोकांतिका शंभू राजेंच्या वाट्याला आली. शिवरायांनी एक महापुत्र या भूमीला दिला होता. पण तो तेजस्वी महापुत्र सांभाळण्याइतकी पात्रता या भूमीमध्ये नव्हती, असंच आपल्याला दुर्दैवाने मान्य करावं लागेल.'' हे वाक्य विश्वास पाटील यांनी २२ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांच्या युट्यूब चॅनलवर 'संभाजीराजांच्या घातपाताचे दुष्ट चक्र' या व्हिडीओत उच्चारले आहे. मराठी माणूस शिव-शंभूंचं तेज धारण करायला कमी पडला, हे सत्य नाकारता येत नाही वाचकहो...



आपल्या राज्यात जातिवाद निर्माण करण्यात एका विशिष्ट विचारधारेचा हात आहे. पुरोगामी या शब्दामुळे आपली वाताहत झाली आहे. पुरोगामित्व हे सर्व रोगांवरील औषध असेल असं भासवून आपल्याला 'स्लो पॉयजन' देण्यात आलं आणि हे स्लो पॉयजन आपल्या रक्तात इतलं भिनलंय की, जातिवादाशिवाय आपल्याला दुसरं काहीच दिसत नाही. त्याहीपेक्षा मोठं दुर्दैव म्हणजे आपण आपला जातीयवादाचा कंड शमवण्यासाठी महापुरुषांच्या नावांचा वापर करतो. समर्थ रामदास या महापुरुषाकडे केवळ ते ब्राह्मण आहेत म्हणून डोळेझाक करतो. त्यांचं साहित्य उच्च दर्जाचं आहे. त्यांनी रचलेल्या आरत्या आपण घरोघरी म्हणत असतो. स्वराज्यामध्ये त्यांनी दिलेलं योगदानही लक्षणीय आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर हे अफलातून व्यक्तिमत्त्व आपण कधी जाणून घेण्याचा प्रयत्नच केला नाही. त्यांच्यावर कोणत्या आधारावर बेछूट आरोप केले जातात? सावरकरांचा काळ हा काही प्राचीन किंवा शिवकाळ नाही. तर तो आधुनिक काळ आहे. त्या काळाविषयीचे अनेक पुरावे, संदर्भ सहज उपलब्ध आहेत. त्यामुळे त्या काळाविषयी संभ्रमता असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तरीसुद्धा मुद्दामून कोणतेही मुद्दे काढून सावरकरांवर टीका केली जाते. त्यांच्यावर गलिच्छ आरोप केले जातात. तेव्हा मला त्या आरोप करणाऱ्यांचीच कीव येते. कारण सावरकरांवर चुकीचे आरोप करून आपण आपलेच नुकसान करतोय. सावरकर तर 'धन्योहं धन्योहं' म्हणत पुढच्या प्रवासाला निघून गेले. त्यांना काही फरक पडणार आहे का? पण सावरकर हे रत्न आहे. या रत्नाची पारख करण्याची आपली लायकी नाही. नुकसान आपले होते, आपल्या समाजाचे होते. छावा चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर सावरकरांनीच संभाजी महाराजांची बदनामी केली, अशी टीका काही महामूर्ख लोकांनी केली आहे. त्यावर सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी पुरावे सादर करून समर्पक उत्तरही दिलं आहे. लक्षात ठेवा, आरोप करणाऱ्यांनाही बऱ्याचदा सत्य परिस्थिती माहिती असते. पण जातीयवाद हा त्यांचा धंदा आहे आणि तो कितीही गंदा असला, तरी तो धंदा आहे. मात्र, स्वातंत्र्यवीर सावरकर हे छत्रपतींचे निष्ठावान भक्त होते, कृतिशील भक्त होते. त्यांच्या मनात छत्रपतींविषयी असलेली भावना त्यांनी अनेकदा व्यक्त केली आहे.

*हे हिंदुशक्ति-संभूत-दीप्तितम-तेजा*
*हे हिंदुतपस्या-पूत ईश्वरी ओजा*
*हे हिंदुश्री-सौभाग्य-भूतीच्या साजा*
*हे हिंदु-नृसिंहा प्रभो शिवाजीराजा*
किंवा
*जयदेव जयदेव जय जय शिवराया !*
*या या अनन्य शरणा आर्यां ताराया !!धृ!!*
*आर्यांच्या देशावरि म्लेंच्छांचा घाला*
*आला आला सावध हो शिवभूपाला*
*सद्गदिता भूमाता दे तुज हाकेला*
*करुणारव भेदुनि तव हृदय न का गेला..*

सावरकर रचित ही दोन्ही गीते शिवजयंतीला लावली जातात. या गीतांमध्ये सावरकरांची शिवभक्ती सहज दिसून येते. यासाठी वेगळ्या पुराव्यांची आवश्यकता नाही. आता तर मी आरोपांचं खंडण करणं वगैरे सोडूनच दिलं आहे. कारण आरोप करणाऱ्यांना पुरावे किंवा उत्तरे नको असतात. तर त्यांनी मांडलेलं असत्य हे सत्य असल्याचं सिद्ध करायचं असतं. माझे मित्र मला कधी कधी विचारतात की, ''सावरकरांनी इतक्या चुकीच्या गोष्टी केल्या तर आम्ही त्यांना देशभक्त का मानायचं?'' हे सगळे व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी आहेत. या व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटीमध्ये पुरावे सादर करण्याची पद्धत नसते. ''आलं फॉरवर्ड की केलं फॉरवर्ड'' हाच यांचा अभ्यासक्रम. पण सावरकरांचं साहित्य, चरित्र वाचण्याचे कष्ट आपण घेतले तर आपल्या लक्षात येईल की, छत्रपतींना आदर्श मानून सावरकर कार्य करीत होते. मुघल या परकीय शक्तीप्रमाणे सावरकरांच्या काळात इंग्रज होते. सावरकरांना इंग्रजांना पळवून लावून स्वराज्य स्थापन करायचं होतं. त्यासाठी सर्व जातींना एकत्र आणण्यासाठी त्यांनी हिंदुत्वाची चळवळ राबविली. पूर्वास्पृश्योद्धाराची चळवळ राबविली. हिंदू एकत्र आले तर इंग्रज काय जगातली कोणतीही शक्ती हिंदुस्थानाकडे वाकड्या नजरेने बघण्याची हिंमत करणार नाही, असा विश्वास सावरकरांना होता आणि हा विश्वास त्यांना छत्रपतींच्या भक्तीतून मिळाला. माउलींपासून छत्रपती शिवराय आणि छत्रपती शंभू राजे ते सावरकर यांच्यापर्यंत महाराष्ट्राला अनेक महापुरुष लाभले. पण **(पान ५ वर)**

## वेध

**विजय कुळकर्णी**

# सुरक्षेसोबतच बसेसची संख्याही वाढवा!

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्यातील एस. टी. महामंडळाच्या बसस्थानक व आगारांचे सुरक्षा परीक्षण करण्याचा आदेश दिला आहे. मात्र, सुरक्षेसोबतच राज्यातील सर्वच आगारांतील बससेची संख्या देखील वाढविण्याची नितांत गरज आहे.

एस. टी. महामंडळाची राज्यातील बहुतेक तालुक्याच्या ठिकाणी आगारे आहेत. बसस्थानके आहेत. काही ठिकाणी तर दोनबसस्थानके आहेत. राज्यातील विदर्भ, मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत आजही रेल्वे नाही. त्यामुळे या भागातील प्रवाशांना एस. टी. नेच प्रवास करावा लागतो. त्यातच राज्य सरकारने ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थ्यांना प्रवासात विशेष सवलत दिली आहे. त्यामुळे एस. टी. ने प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. प्रवासी वाढल्याने बसस्थानकांवर गर्दी वाढली आहे. या गर्दीचा फायदा घेऊन खिसेकापू व भुरट्या चोरांचा सुळसुळट झाला आहे. बसमध्ये चढताना उतरताना महिलांच्या गळ्यातील दागिने, पर्स चोरीला जाण्याच्या घटना वाढल्या आहेत. शाळकरी मुली व महिलांच्या छेडखानीचे प्रकार बसस्थानकावर जवळपास दररोज घडतात. काल परवाच बसमध्ये एका मुलीवर अत्याचार झाल्याची घटना घडली. याला आळा घालण्यासाठी बसस्थानक व आगारातील सुरक्षा व्यवस्था वाढविणे आवश्यक आहे.



आज ही सुरक्षा पोलिसांवरच अवलंबून आहे. मात्र, त्या त्या शहराची लोकसंख्या बघता पोलिसांची संख्या देखील कमी पडते. एक दोन पोलिसांच्या भरवशावर या बसस्थानकांची सुरक्षा आहे. तेव्हा, पोलिसांची संख्या देखील वाढविणे आवश्यक आहे. प्रवाशांची संख्या बघता बसेसची संख्या अत्यंत तोकडी आहे. त्यातच अनेक बसेस कालबाह्य झाल्या आहेत. पण, या बसेस आगारात गेल्यावर केवळ चालक आणि वाहकांची अदलाबदल होऊन ती बस पुन्हा स्थानकात पाठवून नियोजित स्थळी फेरीसाठी पाठविली जाते. त्यामुळे त्या बसेसची देखभाल व दुरुस्ती देखील होत नाही. मग या बसेसच स्थानकातून निघाल्यावर अनेकदा वाटेतच बंद पडतात. त्याचा चालक-वाहकांसह प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो. आता परिवहन मंत्र्यांनी निर्लेखित बसेस महामंडळाच्या ताफ्यातून काढण्याचा आदेश दिला आहे. १५ एप्रिलपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचेही त्यांनी या आदेशात म्हटले आहे. पण, त्यापूर्वी नवीन बसेच राज्यातील सर्व आगारांना देऊन त्यांची सेवा कार्यान्वित करणे आवश्यक आहे. अन्यथा आज आहे त्यापेक्षाही एस. टी. ची प्रवासी सेवा विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, ज्याप्रमाणे रेल्वेने कोणती रेल्वे कोणत्या स्थानकातून सुटली. ती सध्या कुठे आहे. ती एखाद्या स्थानकावर किती वेळात पोहचेल, इत्यादी माहिती प्रवाशांना मिळण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तशी व्यवस्था एस. टी. ने देखील उपलब्ध करून दिल्यास प्रवाशांची सोय होईल. त्यादृष्टीने प्रत्येक बसमध्ये जीपीएस सेवा कार्यान्वित करण्याचा आदेश परिवहन मंत्र्यांनी दिला आहे. पण, त्याची काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. एस. टी. ने प्रवाशांची उचल करण्यासाठी या सर्व सुविधांसह बसेसची संख्या वाढविल्यास प्रवाशांना एस. टी.चा प्रवास सुखकर होणार आहे. तसे झाले तरच, बहुजन हिताय बहुजन सुखाय हे एस. टी. चे ब्रीद प्रत्यक्षात उतरणार आहे. यासोबतच बसस्थानकांची स्वच्छता व बसस्थानकातील स्वच्छतागृहांची साफसफाई देखील आवश्यक आहे. सामान्यतः कोणत्याही बसस्थानकात बकऱ्या, मोकाट कुत्रे, डुकरे वावरताना दिसतात. त्यावर नियंत्रण मिळविणे आवश्यक आहे. राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावरील शहरातील बसस्थानकावर रात्रीच्यावेळी देखील बस वाहतूक सुरू असते. त्यामुळे रात्रीच्यावेळी देखील अशा बसस्थानकात प्रवाशांची संख्या मोठी असते. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने देखील उपाययोजन होणे आवश्यक आहे. या सर्व सोयी सुविधा एस. टी. महामंडळाने केल्यास प्रवाशांचा प्रवास निश्चितच सुखकर होईल!

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# होऊन जाऊ द्या उद्धवसाहेब!

'हमें मराठी नहीं आती म्हणणाऱ्याच्या कानाखाली आवाज काढा...'' असा आदेश काल अर्थात मराठी भाषा दिनी आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात बोलताना आपल्या उद्धवसाहेबांनी कार्यकर्त्यांना दिला. मराठीचा अभिमान, स्वाभिमान, मुंबईतील मराठी माणूस, मराठी अस्मिता, माय मराठी वगैरे वगैरे, उर्दूत कॅलेंडर छापणाऱ्या, जनाब लिहून घेणाऱ्या, अजान स्पर्धा भरवणाऱ्या आणि मतांची भीक मागत मुंबईतील मुस्लिम भागात ''हमार हिंदुत्व वैसा नहीं, ऐसा नहीं...'' सांगत फिरणाऱ्या उद्धवसाहेबांना अचानक पाच-सहा वर्षांनी का होईना, पण आज अचानक आठवले, यातच आपण समाधान मानले पाहिजे. काही का असेना, पण साहेबांनी दिलेल्या आदेशाची कार्यकर्त्यांनी अंमलबजावणी केली पाहिजे. मात्र, या दिलेल्या पक्षाच्या उपक्रमांची सुरुवात साहेबांच्या हस्ते झाली तर, राज्यात हे 'कानाखाली वाजव अभियान' व्यवस्थित राबविला जाईल. तसेही कुठल्याही कार्यक्रमाची सुरुवात देशाचे प्रमुख, राज्याचे प्रमुख, पक्षाचे प्रमुख, गटा-तटांचे प्रमुख स्वतःच करतात. मग या अभियानाची सुरुवात साहेबांनी आपल्या शुभहस्ते कारायला काय हरकत आहे? चला मुंबईच्या रस्त्यावर उतरा आणि तुमच्या शुभहस्ते 'कानाखाली वाजव' अभियानाची सुरुवात करून, कार्यकर्त्यांना अभियान राबविण्यास प्रोत्साहन द्या... मग होऊन जाऊ द्या उद्धवसाहेब!

नाही हो साहेब..! मुंबईच्या रस्त्यावर उतरायची गरज नाही. रस्त्यावरच्या कोणाच्याही कानाखाली वाजविण्यापेक्षा, मातोश्री एक-दोन जे योग्य वाटेल त्याच्या समोर एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करा आणि तुमच्या राज्यसभेच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी आणि तुमचे वर्सोवाचे आमदार हारून खान यांना बोलावून मराठीत बोलायला सांगा, तेव्हा तुम्हाला इकडे तिकडे कानाखाली वाजवायला गिऱ्हाईक शोधायची गरजदेखील पडणार नाही साहेब. त्यामुळे फार काही कष्ट न घेता, घरगुती छोटेखानी कार्यक्रमात, आपल्याच चार लोकांमध्ये अभियानाची सुरुवात होऊ शकते, नाही का...

यांना ढोंगी माणूस म्हणावं तर ढोंगी माणूसदेखील लाजेल अशी यांची परिस्थिती आहे. अर्थात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत यांना हिंदू आणि मराठी मतांची गरज नसल्यागत हे वागताना दिसत होते. आता महापालिकेत मराठी मतांची गरज असल्याचे लक्षात आल्यावर मराठी माणसाला चुचकारण्याचा प्रयत्न करताहेत साहेब. प्रियांका चतुर्वेदींना राज्यसभेवर पाठविताना यांना मराठी माणूस आठवला नाही. एवढंच काय, तर प्रीतीश नंदी, संजय निरुपम, एकनाथ ठाकूर, मुकेश पटेल, राजकुमार धूत, चंद्रिका केनिया अशा सगळ्यांना राज्यसभेवर पाठविताना मराठी माणूस यांना कधी दिसला नाही. एवढंच काय, पत्राचाळ घोटाळा म्हणजे, गोरेगाव परिसरातील ४७ एकरांत पसरलेल्या ६७६ मराठी कुटुंबांना फ्लॅट देण्याचे स्वप्न दाखवून, छत्र हिरावून घेणारा, मराठी कुटुंबांना बेघर करणारा हा घोटाळा होय. आणि महत्त्वाचं म्हणजे या घोटाळ्यात साहेबांचे अत्यंत आवडते व्यक्ती संजय राऊतांचा थेट सहभाग आहे. कोविड काळात झालेल्या खिचडी घोटाळ्याचे पैसे लाटणाऱ्यांमध्येदेखील साहेबांचे विश्वासू राऊत बाप-लेक आहेत. पण मराठी माणसांना बेघर करणाऱ्या, मराठी मुलांच्या पोटावर मारणाऱ्यांच्या कानाखाली आवाज काढा, असे कधी उद्धव साहेब आजवर बोलल्याचे ऐकिवात नाही. केतकी चितळेची काय चूक होती, पण साहेबांनी तिला तुरुंगात टाकले. काय केले होतं तिने? अन्य कोणीतरी लिहिलेली एक व्यंग्य कविता तिने केवळ फॉरवर्ड केली. दुसरीकडे मंत्रिपदावर असलेल्या जितेंद्र आव्हाडने अनंत करमुसेला मारहाण केली. तेही त्याच्या बंगल्यावर नेऊन. राहुल कुळकर्णी नावाच्या पत्रकाराने परराज्यात जाणाऱ्या लोंढ्यांची केवळ बातमी दाखवली. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गप्पा करणाऱ्यांनी, संविधान बचावच्या वल्गना करणाऱ्यांनी एका पत्रकाराच्या कर्तव्यावर घाला घालत त्याला तुरुंगात टाकले. समाज माध्यमावर सरकार विरोधात लिहितो म्हणून, एका १८-१९ वर्षाच्या युवकाला तुरुंगात टाकले. तेव्हा केतकी, अनंत, राहुल हे सगळे मराठी आहेत आणि आपल्याला मराठीचा अभिमान असल्याने कारवाई करू नका म्हणण्याचे धाडस स्वतः मुख्यमंत्री असताना गृहमंत्र्यांना सांगण्याचे झाले का? किंबहुना यांची मराठी अस्मिता, स्वाभिमान, अभिमानदेखील आज जसा जागा झाला तसा त्यावेळी जागृत झाला नाही, याचे आश्चर्य वाटते. त्यामुळे अशा या स्वार्थी वृत्तीला ढोंगी नव्हे तर काय म्हणावे?

अयोध्येत प्रभू रामाचे भव्य मंदिर उभे राहिले. महाराष्ट्रातील ढोंगी हिंदुत्ववादी सोडले तर कोट्यवधी श्रद्धाळू दर्शन करून आले. महाराष्ट्राचे, मराठी माणसांचे श्रद्धास्थान असलेल्या छत्रपती संभाजी महाराजांवरील 'छावा' सिनेमा आला. महाराष्ट्रातील ढोंगी हिंदुत्ववादी सोडले, तर जगभरातील कोट्यवधी लोकांनी तो पाहिला आणि भरभरून कौतुकदेखील केले. कित्येक वर्षांनंतर येणारा कुंभमेळा भरला. महाराष्ट्रातील ढोंगी हिंदुत्ववादी सोडले तर जगभरातील हिंदूच नव्हे, तर अन्य धर्मीय अशा कोट्यवधी भाविकांनी भक्तिभावाने सहभागी होऊन पवित्र स्नान केले. जय श्रीराम आणि राम-राम बोलण्यावर टिप्पणी करून मेंदूत किती घाण भरली आहे, याचा परिचयदेखील साहेबांनी दिला. प्रभू रामाच्या दर्शनाला जाण्याचे टाळणारे ढोंगी आता राम-राम आणि जय श्रीराम बोलण्यावर आपले तत्त्वज्ञान पाजळताना दिसत आहेत. त्यामुळे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलारांनी आपल्या 'एक्स' या सोशल मीडिया अकाऊंटवरून एक चारोळी पोस्ट केली आहे. ती या अशा ढोंगी लोकांना तंतोतंत लागू होते.

सभेत दाखवण्यापुरती हातात रुद्राक्षांची माळ घाली
औरंगजेबाचा जप ज्यांच्या सदैव असे तोंडी.
ओळखलेत का? महाराष्ट्रातील ते हिंदुत्ववादी ढोंगी?

९२७०३३३८८६

## महाकुंभाचा आनंद पर्व

महाकुंभ महापर्वाची सांगता झाली. दीडमहिना हे महापर्व सुरू होते. जवळ जवळ भारताच्या लोकसंख्येच्या अर्ध्या लोकांनी या पर्वाचा लाभ घेतला आहे. आम्हाला काही कारणांनी जाता आले नाही. परंतु जे जाऊन आलेत त्यांनी जे सांगितले, बातम्या वाचल्या ते खरोखरच सर्व अद्भुतहोते. रोजलाखो लोकांची व्यवस्था होत होती. यामुळे अनेकांना रोजगार मिळाला. लोकांनी नवीन व्यवसाय केले. आज उत्तरप्रदेशची लोकसंख्या मोठी आहे. तिथे मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता आहे. भाजपा सरकार आल्यापासून तिथल्या अर्थव्यवस्थेत चांगलीच सुधारणा झाली आहे. आज या महापर्वावर जो खर्च झाला तो वसूल झाला व उत्पन्न वाढले.



खरोखरच १४४ वर्षांनी आलेला हा योग आनंद निर्माण करणारा ठरला आहे. श्रद्धेने लोक तिथे गेलेत तसेच श्रद्धेमुळेच ८ ते १० तास वाहतूक कोफ्लडीत थांबावे लागले तरी त्याचा थकवा आला नाही. फक्त स्नानाची ओढ होती. मागचा योग जेव्हा आला असेल म्हणजे १४४ वर्षांपूर्वी तेव्हा पारतंत्र्य असेल. हा योग खूपच चांगला म्हणावा लागेल. प्रयागराजच्या रहिवाशांना खूप त्रास सहन करावा लागला. घरी आलेल्या पाहुण्यांचा जसा आपल्याला त्रास होत नाही तसाच त्यांनी आनंदाने सहन केला. या महापर्वात गरीब-श्रीमंत असे तिथे आल्यावर काही नव्हते. फक्त सगळे एकाच भावनेने आलेले होते. सगळे छान पार पडले. महाकुंभ हे आनंदपर्व ठरले आहे. योगी सरकारने उत्तम व्यवस्था करून हा आनंद सगळ्यांना दिला आहे. जय गंगा माता हर गंगे. तिला त्रिवार नमस्कार.

**प्रा. अंजली पळणीटकर**/९८२२६९१२८८

## वाचक पत्रे

## ट्रम्प यांची अमेरिकेसाठी गोल्ड कार्डद्वारे गुंतवणुकीसाठी हाक



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुंतवणूकदारांसाठी गोल्ड कार्ड ही नवी योजना जाहीर केली आहे. जर अमेरिकेमध्ये ५० लाख डॉलर्सची गुंतवणूक केली तर अमेरिकेचा व्हिसा त्या व्यक्तीला दिला जाणार आहे . विशेष म्हणजे अमेरिकन नागरिकत्वाचा मार्गही त्या व्यक्तीसाठी खुला होणार आहे. जे श्रीमंत आहेत व खूप पैसा खर्च करातात तसेच मोठ्या प्रमाणावर कर सुद्धा भरतात अशा लोकांना ही एक संधी आहे . तसे अमेरिकन नागरिकत्व मिळणे अलिकडच्या काळात अवघड झाले आहे . इतर देशांतही अशा काही योजना आहेता गुंतवणूकदारांना जगभरात अनेक देश व्हिसा देतात . त्यामध्ये ब्रिटन, स्पेन, ग्रीस, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इटली इत्यादी देशांचा समावेश आहे. अमेरिकन सरकार एक कोटी गोल्ड कार्ड विकू शकते. आज अमेरिकेसारख्या प्रगत व स्वच्छ शहरात नोकरी किंवा एखादा उद्योग मिळणे हे एक भाग्यच म्हणावे लागेल. सुंदर राहणी, उच्च शिक्षणाच्या मोठ्या सोई, स्वच्छता, कायदा व सुव्यवस्था या गोष्टींमुळे अनेक देशातील नागरिकांना अमेरिकेत जाण्याचे व राहण्याचे एक वेगळे वैशिष्ट्य वाटते त्याचाच फायदा ट्रम्प घेत आहेत असे म्हटल्यास वावगे होऊ नये. यामुळे अमेरिकेचा सुद्धा फायदाच होणार आहे. कारण अमेरिकेत नवीन गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळणार आहे आजही भारतातील अनेक जण अमेरिकेत जाण्यास व गुंतवणूक करण्यास इच्छुक आहेत

**शांताराम वाघ**/पुणे

## सांडपाण्यामुळे गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी प्रदूषित

१८ फेब्रुवारी २०२५ च्या तरुण भारतात एक बातमी वाचण्यात आली. ती अशी, शहरातील ११७ एमएलडी सांडपाणी मिसळते नद्यांमध्ये. शहरातून नाग नदी, पिवळी नदी आणि पोहरा नदी अशा तीन नद्या वाहतात. या नद्यांमधून दररोज ५२० एमएलडी सांडपाणी वाहते. या सांडपाण्यांपैकी ४०३ सांडपाण्यावर एसटीपीद्वारे प्रक्रिया केली जात असून उर्वरित ११७ एमएलडी सांडपाणी वाहून नदीमध्ये जाते. या घाण पाण्यामुळे नदीतील पाणी दूषित झालेले आहे.



भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीवर गोसीखुर्द मोठा पाटबंधारे प्रकल्प बांधण्यात आलेला आहे व या प्रकल्पात पाणीसाठा पण करण्यात आलेला आहे. नाग नदी कन्हान नदीला मिळते आणि कन्हान नदी वैनगंगा नदीला मिळते. त्यामुळे नाग नदीचे सांडपाणी हे गोसीखुर्द प्रकल्पाच्या पाणीसाठ्यात मिसळते. त्यामुळे पर्यायाने गोसीखुर्द प्रकल्पाचा पाणीसाठा प्रदूषित होतो. सबब,नाग नदीत सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर एसटीपीद्वारे प्रक्रिया त्वरित करून शुद्ध पाणी कन्हान नदीत व नंतर वैनगंगा नदीत सोडण्यात यावे असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# अल्पवयीन गुन्हेगारांनी केलेली घरफोडी उघड
# पाच लाखाचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ मार्च**

वजिराबाद गुन्हे शोध पथकाने दि. २८ फेब्रुवारी रोजी अल्पवयीन बालकानी केलेला घरफोडीचा गुन्हा उघड केला असून, त्यांच्याकडून नगदी ४ लाख ८० हजार रुपये व पंधरा ग्रॅम सोने असा एकूण पाच लाख ४७ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



वजिराबाद पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर नं.५७९/२४ या गुन्ह्यातील आरोपी करबला रोड दिवानी बोडी याठिकाणी असल्याची माहिती मिळाल्यावरुन वजिराबाद पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने करबला रोड येथे जावून एक अल्पवयीन मुलगा व मुलगी यांची चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केले. तसेच गुन्ह्यातील चोरी केलेला मुद्देमाल रोख रक्कम चार लाख ८० हजार व पंधरा ग्रॅम सोने पोलीस ठाण्यात जमा केले. हि कारवाई पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक राजू वटाणे, पोलीस उपनिरीक्षक व्ही.ए.बिक्कड, पोहेकॉ.नंदे, मठपती, शेख इम्रान, रमेश सूर्यवंशी, व्यंकट गंगुलवार, भाऊसाहेब राठोड, बावरी, साखरे यांच्या पथकाने केली.

# किनवट कृउबा समीती संचालक मंडळ बरखास्त करा : आ. केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०१ मार्च**

मराठवाड्यातील आदिवासी क्षेत्रातील किनवट येथील कृषी उत्पन्न बाजार समिती असून या बाजार समितीचे सभापती व संचालक मंडळातील सर्व सभासदाचे संगणमताने बाजार समितीत अनेक वर्षापासून आर्थिक गैरव्यवहार व्यवहार केल्याने कार्यरत कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांना अनेक वर्षापासून पगार देणे बाकी असल्याने त्या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे तरी कृषी उत्पन्न बाजार समितीत कार्यरत असलेले सभापती व संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती करुन झालेल्या गैरवहाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे . आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात पुढे असे नमूद केले आहे



की गेल्या अनेक वर्षापासून किनवट कृषी उत्पन्न बाजार समिती राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट या पक्षाच्या ताब्यात असून शेतकऱ्याच्या हीताचे कुठले ही कामे केली जात नाहीत. यापूर्वी शेतकऱ्यांचे हित साधून कृषी उत्पन्न बाजार समिती भरभराटीस आली होती पण आता सध्या करत असलेल्या संचालक मंडळाने भ्रष्टाचार करून ही संस्था डबघाइला आनली आहे कार्यरत कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अनेक वर्षापासून पगार देण्याची ऐपत ही बाजार समिती राहिली नाही एवढेच नसून सदर बाजार समितीमध्ये भ्रष्टाचार केला यामुळे यामुळे कर्मचाऱ्यावर पगार अभावी उपासमारीची वेळ आली आहे सदर बाजार समितीद्वारे खाजगी व्यक्तींना बाजार समितीच्या विनाशीक्याच्या पावती द्वारे बाजारपेठेत वसुली करण्याचे कॉन्ट्रॅक्ट देऊन भ्रष्टाचार केला जात आहे त्यामुळे कर्मचाऱ्यावर पगाराविण्याचा दिवस काढण्याची वेळ आली आहे हे मानवतेला लाजिरवाणी बाब आहे सदर बाबीकडे पण व सहकार विभागाचे अधिकारी कोणत्याही प्रभावी नियंत्रण ठेवत नसल्याने किनवट बाजार समितीकडून खाजगी कंत्राटदारास ३० लक्ष रुपयावर बाजार फीस वसुलीसाठी कंत्राट दिले असून कर्मचारी वर्ग गेल्या अनेक वर्षापासून पगाराच्या प्रतीक्षेत असून सदर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बऱ्याच बाबी मध्ये अनियमित्ता प्रचंड गैरव्यवहार असून त्याची उच्चस्तरीय चौकशी करून भ्रष्टाचार करणारे सभापती व संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकीय मंडळ नेमून बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांचे थकीत पगारीस कारणीभूत असलेल्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी असेही या निवेदनात नमूद केले आहे. माहाराष्ट्र शासनाने जिल्हा उपनिबंधकाला तातडीने मागवीला चौकशी अहवाल महाराष्ट्र शासनाच्या सहकार व पर्यावरण व वस्त्र उद्योग विभाग मंत्रालय मुंबई यांनी आमदार भीमराव केराम यांच्या तक्रारीची गांभीर्याने दखल घेतली असून प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र कृषी उत्पन्न उत्पात्र विकास व विनियम अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६६ मधील तरतुदीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करून अहवाल स्वयं स्पष्ट अभिप्राय तातडीने शासनास सादर करावा असे आदेशही जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नांदेड यांना या विभागाच्या कक्ष अधिकारी शैलेश सुर्वे यांनी दिले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### गुरुद्वारा बोर्डातील गैरव्यवहाराची चौकशी करा : गल्लीवाले

**नवीन नांदेड**-गुरुद्वारा तक्त सचखंड बोर्डाची सर्वच क्षेत्रात होणारा भ्रष्टाचाराची कायदेशीर व प्रशासकीय स्तरावर चौकशी करण्यात यावी



अशी मागणी दीपक सिंग रतन सिंग गल्लीवाले यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निवेदनाद्वारे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे. नांदेड येथील गुरुद्वारा तक्त सचखंड श्री हुजूर साहेब मंडळात गेल्या पंचवीस वर्षापासून महाराष्ट्र सरकार द्वारे लोकशाही पद्धतीने स्थापन केलेल्या गुरुद्वारा मंडळाला बरखास्त करून कधी प्रशासक नियुक्ती करून शीख अल्पसंख्याक समुदायावर अन्याय केला जात आहे. यापूर्वी नांदेड सिख गुरुद्वारा सचखंड श्री हुजूर अबचल नगर साहेब कायदा १९५६ अन्वे कलम ११ मध्ये सुधारणा करून महाराष्ट्र सरकारने मंडळातून अध्यक्ष नियुक्त करण्याचे अधिकार काढून घेतले होते. ज्या स्थानिक शीख समुदायाच्या लोकांनी तीव्र विरोध केला होता अगस्ट २०२५ पासून मंडळाचे प्रकाशक डॉ. विजय सदबीर सिंगजी यांनी पदभार स्वीकारला परंतु ते या जबाबदारी बद्दल उदासीन राहिली. ते स्थानिक नाहीत म्हणून त्यांचे दौरे ही कमी असतात आणि गुरुद्वारा सचखंड मंडळाचे कार्यालय सुरळीत चालवीण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. सध्या देखील मोठ्या घोटाळ्यामध्ये निलंबित झालेल्या वरिष्ठ अधिकाऱ्याना मंडळाच्या कार्यालयाची सर्व जबाबदारी देण्यात आली आहे. असा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. सदरील बाबी प्रशासनाने व महसूल मंत्री यांनी चौकशी करून न्याय देण्यात यावा अशी मागणी दीपक सिंग गल्लीवाले यांनी केले आहे.

### मुदखेड येथील रईस मुलतानी पवित्र उमराहसाठी रवाना

**मुदखेड**-मुदखेड शहरातील पेंट व्यवसायातील प्रसिद्ध असलेले व्यापारी हाजी अब्दुल रशीद मोहम्मद इस्माईल मुलतानी यांचे ज्येष्ठ सुपुत्र



रईस मुलतानी आपल्या पत्नीसह मुस्लिम धर्मियांचे पवित्र स्थान असलेले मक्का मदीना या ठिकाणी दि. २ मार्च रोजी पासून सुरू होत असलेल्या पवित्र रमजानच्या महिन्यांमध्ये रवाना होणार आहेत. मुस्लिम धर्मियांमध्ये रमजानच्या पवित्र महिन्यात जर मुस्लिम अनुयायी उमरा हा धार्मिक विधी करणे म्हणजे मुस्लिम धर्मात सर्वश्रेष्ठ असलेले हज करण्यासारखे असते असाच समज आहे. उमराह पवित्र विधीसाठी मुस्लिम धर्मीय नागरिक रमजान महिन्याच्या सुरुवातीला आपल्या आर्थिक सोयीनुसार सौदी अरेबिया या देशातील मक्का आणि मदिना या पवित्र शहरांची भेटी करत धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी जात असतात यावर्षी मुदखेड शहरातील पेंटसाठी प्रसिध्द असलेले रईस मुलतानी यांचा विमान दि. २ मार्च रोजी असून धार्मिक यात्रा एकूण ३५ दिवसांची असणार असल्याची माहिती त्यांनी दिली. शहरातील नागरिकांनी त्यांची भेट घेत पवित्र धार्मिक विधी जात असताना शुभेच्छा दिल्या. यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे तालूकाध्यक्ष प्रतापराव देशमुख, काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे, तालुका काँग्रेस कार्याध्यक्ष गौस नबीसाब, शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण, शहर सचिव अतीख अहेमद, इकबाल कुरेशी, शेख जाविद, ज्येष्ठ पत्रकार शेख इमाम शेख फरीद , शेख मोईन फुलारी, मोहम्मद शरीफ बागवान, लतिफ टेलर, हफीझ मुलतानी, पत्रकार मोहम्मद हकीम,अजहर मच्छीवाले,कपिल लोखंडे,इब्राहिम मुलतानी, माजीद लाला,आदी सह अनेकांनी देशात सुख,शांती आणि सामाजिक सलोखा कायम ठेवत समृध्दीसाठी प्रार्थना केली.

### हाणेगाव येथे भीमशक्ती सामाजीक संघटनेच्या वतीने शिवजयंती साजरी



**हाणेगाव**-छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्य दि. २८ फेब्रुवारी रोजी भव्य व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. यावेळी सर्वप्रथम शिवाजी महाराजांच्या प्रतीमेचे पुजन व पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी सरपंच प्रशांत देशमुख व प्रमुख पाहुने म्हणुन सरपंच शारदादेवी राठोड, संकेत पाटील प्रमुख वक्ते प्रदीप ढगे,बालाजी इंगळे, बाबु खुतमापुरकर, दिलीप बंदखडके, बालाजी चोपडे, योगेश देशमुख, शिवकांत माळगे, प्रा.सुरेश झमकाडे, आकाश देशमुख, सुरेश झमकाडे, बबलु पाटील, प्रशांत रामपुरे, बाळासाहेब आडेकर, धनाजी होटले, राजु पाटील, शहाजी पाटील, कपील तलारे, धनाजी नाईकवाडे, शाम नुदनुरे, श्रेयश माने आदींनी यावेळी कार्यक्रमासाठी परीश्रम घेतले तर प्रमुख वक्ते प्रदीप ढगे यांनी शिवचरीत्र सांगीतले आणि शाळेतील लहान मुलांनी पोवाडे, भाषण, शिवगीते गायन करुन सर्वांचे मन जिंकले. यावेळी संपुर्ण परीसर शिवमयं झाला होता.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संजीवनी औटी यांनी केले तर आभार शिवजयंतीचे आयोजक भिमशक्ती सामाजीक संघटणेचे तालुका अध्यक्ष किशोर आडेकर यांनी केले आहे.

### परीक्षांसाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू

**नांदेड**-केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्डाच्या इयत्ता १० व १२ वी परीक्षा सध्या सुरू असून शहरातील ज्या शाळांमध्ये या परीक्षा सुरू आहेत त्या परिसरात शांतता राखण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. शहरातील ८ शाळांमध्ये या परीक्षा होत असून सकाळी १०.३० ते दुपारी १.३० यावेळेत प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे. त्यामुळे या कालवधीत शांतता पाळावी व प्रतिबंधात्मक बाबी करू नये असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# सुधाकरराव देशमुख यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. ०१ मार्च**

उमरी तालुक्यातील युवा नेतृत्व व भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुधाकरराव देशमुख यांनी अखेर दि. २८ फेब्रुवारी रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार व आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदेड येथील ओम गार्डन येथे हजारो जनसमुदायाच्या उपस्थित पक्ष प्रवेश केला आहे.



सुधाकर देशमुख यांची उमरी तालुक्यावर चांगली पकड असून सगळ्याच पक्षात त्यांना मानणारा मोठा वर्ग असून विरोद्धक ही त्यांचे फॅन्स असल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा होत आहे.

८ दिवसापूर्वीच सहविचार सभेत त्यांनी त्यांच्या धानोरा बु या गावात गोराठा जिल्हा परिषद गटातील सरपंच, उपसरपंच, चेअरमन व प्रतिष्टीत लोकांची अंदाजे दोन ते तीन हजार लोकांची बैठक घेऊन आपला निर्णय सांगितला होता. यावेळी अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करतांना आपण निर्णय घेऊन गोराठा जिल्हा परिषद निवडणूक लडवावी असे बोलून दाखवले होते. मात्र देशमुख यांचे गोरठेकर घराण्यांशी पण जवळकीच संबंध असल्याने चिखलीकर यांना मध्यस्थी करून येणाऱ्या काळात हे दोन्ही देशमुख कुटुंबीय मोठा निर्णय राजकीय निती प्रमाणे घेवू शकतात हा चर्चेचा विषय बनला आहे .

गोरठा जिल्हा परिषद गट हा यापूर्वी सर्वसाधारण स्त्री यासाठी आरक्षित करण्यात आला होता. त्यामुळे येथे फारकाही बदल न होता स्त्रीच्या एवजी पुरुष येवडाच बदल होईल असे राजकीय जानकरांचे म्हणणे आहे. त्यामुळे याच गटात देशमुख यांचे धानोरा बु हे गाव पंचायत समिती गणात असून या गणात आजतरी देशमुख यांना मानणारा मोठा वर्ग असल्याचे दिसून येत आहे. उमरी तालुक्यातील सरपंचाची अनेक कामे सुधारकर देशमुख यांनी कोणतेही राजकीय सत्तेचे पद नसतानां करून दाखविले आहे. त्यांनी खंबिर नेतृत्वाने ग्राम विकासासाठी अंदोलन चळवळी करून रस्त्यावर अनेक वेळा जनतेसाठी उतरले आहे . तत्कालीन सताधारी यांने विकास कामे न केल्याने थेट मंत्रालया वरून उडीमारून आत्महदन करण्याचा इशारा दिल्याने अनेक त्यांच्या मागण्या पुर्ण झाल्याने या भागाला विकासाची चालना मिळाली आहे. यांनी तत्कालीन खासदार व आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे कट्टर समर्थक असून यांच्या माध्यमातून त्यांच्या कालावधीत ही विकास कामे मार्गी लावली असल्याचे अनेक सरपंचांनी विचार विनिमय बैठकीत बोलून दाखवले आहे त्यामुळे स्थानिक स्वराज्य संघटनाची निवडणूक धानोरकर यांना नकीच सोपी जाणार असून तशी त्यांची तयारी असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यांचा नांदेड येथे राष्ट्रवादी पक्षप्रवेशाच्या वेळी आ. मोहनराव हंबर्डे, आ. विक्रम काळे, आ. सतीश चव्हाण, माजी मंत्री नवाब मलिक,व्यकटराव पाटील गोजेगावकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव धर्माधिकारी,ॲड. भाऊसाहेब देशमुख गोरठेकर, मा. शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकर , स्वप्नील चव्हाण, डॉ. विक्रम देशमुख,यांच्यासह हजारो लोकांची उपस्थिती होती.

# माळाकोळी येथे महाशिवरात्र मोहत्सव यात्रा ; रथाची मिरवणूक काढुन सांगता



**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०१ मार्च**

तालुक्यातील माळाकोळी येथे दरवर्षी बाराज्योतीर्लिंग महाशिवरात्र महोत्सव साजरा केला जातो. बाराज्योतीर्लिंग महाशिवरात्र यात्रेच्या कार्ये काळात गावात आंनदी वातावरण निर्माण केले जाते. प्रतेक कुटुंब घरासमोर रांगोळी, फुलांचा वर्षाव करुन घरासमोर रस्ते सजवले जातात.महाशिवरात्र यात्रा महोत्सव २२ ते २८ फेबुरवारी पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन शेवटच्या दिवशी काल्याच्या किर्तनाने सुरुवात करुन माहाप्रसादाचे आयोजन करण्यात येते, दोन दिवश संपूर्ण गावात रथाची मिरवणूक काढुन मोहत्सवाची सांगता केली जाते.

माळाकोळी परिसरातील अराध्यदैवत प्रभु बाराज्योतीर्लींग मंदीरात अखंड हरिनाम सप्ताह, किर्तन, विविध नामंकीत माहाराजांचे प्रवचन, भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण, पंचमुखी प्रमेश्वरांची नंदीतुन मिरवनुक, काडण्यात येते. पंचमुखि प्रमेश्वराची दोन दिवस रथातुन संपूर्ण गावात मिरवणूक काढुन सांगता होते.

# आ. अंतापूरकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो पदाधिकाऱ्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ मार्च**

देगलूर - बिलोली मतदार संघात राजकीय भूकंप झाला असून, काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री, खा.अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आ. जितेश अंतापूरकर यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे व शिवसेना उबाठा गटाच्या शेकडो पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षात आज जाहीर प्रवेश केला आहे. या ऐतिहासिक घडामोडीमुळे देगलूरात भाजपची ताकद वाढली असून, आ. अंतापूरकर यांचे राजकीय प्राबल्य अधिक दृढ झाले आहे.

माजी मुख्यमंत्री आणि ज्येष्ठ नेते आशोकराव चव्हाण यांनी काँग्रेसला रामराम ठोकल्यानंतर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर राजकीय उलथापालथ सुरू झाली होती. त्यांच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्ते संभ्रमात होते. दरम्यान, आ. जितेश अंतापूरकर यांच्या निर्णायक खेळीमुळे आणि त्यांच्या प्रभावी संघटन कौशल्यामुळे मोठ्या संख्येने काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना उबाठा गटाचे शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक भाजपमध्ये सामील झाले आहेत.

### देगलूरात कॉंग्रेस व उबाठाला मोठे खिंडार



राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली प्रगती महिला मंडळाच्या सभागृहात आज शुक्रवार दि.२८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजता भाजप पक्ष प्रवेश सोहळा अतिशय उत्साहात पार पडला. याप्रसंगी देगलूर मतदार संघाचे आ.जितेश अंतापूरकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ.संतुक हंबर्डे, प्रविण साले, एकनाथ पवार, विजय गंभीरे,माजी सभापती माधवराव मिसाळे गुरुजी, बळेगावकर देशमुख,बालाजी पाटील पांडगळे, ॲड. रामराव नाईक, भावनाताई काशेटवार,अनिल पाटील खानापूरकर, शिवकुमार डाकोरे, मनोज राजुरकर, अमित बोंडलावार, अनिल बोंडलावार, यशोदीप कुंभारे, प्रशांत दासरकर, शंकर कंतेवार, जनार्दन बिरादार, बालाजी महिलागिरे,यांच्यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.या पक्षप्रवेशामुळे माजी मुख्यमंत्री, खा.अशोकराव चव्हाण आणि आ. जितेश अंतापूरकर यांच्या जोडीला जिल्ह्यात अधिक बळ मिळाले असून, भाजपला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये मोठा फायदा होणार आहे. जिल्ह्यातील काँग्रेसची अवस्था दयनीय झाली असून, काँग्रेस नेतृत्वासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

आ. जितेश अंतापूरकर यांनी यावेळी नवा विश्वास आणि नव्या संधीचे स्वागत करत पक्षबांधणीसाठी कटिबद्ध राहण्याचे संकेत दिले. या घडामोडींमुळे देगलूरचे राजकीय समीकरणे झपाट्याने बदलत झाले.भाजपच्या या आक्रमक खेळीमुळे काँग्रेस नेतृत्व हादरले असून, जिल्ह्यातील अनेक काँग्रेस नेते आणि कार्यकर्ते आणखी भाजपच्या दिशेने वाटचाल करू शकतात, अशी जोरदार चर्चा सद्या सुरू आहे. आगामी काळात नांदेड जिल्ह्यातील राजकीय वातावरण अजून रंगतदार होणार, हे नक्की !.

# अबब..नांदेड तालुक्यात २२२ शिक्षक दिव्यांग!

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ मार्च**

**खरे किती, खोटे किती?**

केवळ नांदेड तालुक्यातच २२२ अपंग शिक्षकांची नोंद असून, संवर्ग-१ चा लाभ घेण्यासाठी हा प्रकार करण्यात आला असावा असा प्रश्न उपस्थित होत असून, हे अपंग बोगस की खरे याची चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे.

नांदेड जिल्हा परिषदेच्या बदल्यांची लगबग सुरु असून, जवळचे आस्थापनाचे ठिकाण मिळावे यासाठी शिक्षकांची धडपड सुरु आहे. संवर्ग-१ चा लाभ घेण्यासाठी शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात दिव्यांग प्रमाणपत्र काढले असल्याची माहिती आहे. केवळ नांदेड तालुक्यातच तब्बल २२२ दिव्यांग शिक्षकांची नोंद आहे. दिव्यांग प्रवर्गामधून आस्थापना झाली नसतानाही नियुक्तीनंतर दिव्यांगाचे प्रमाणपत्र काढले असल्याच्या तक्रारी आहेत. नांदेड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये जवळपास ७ ते ८ हजार शिक्षक कार्यरत असून, त्यापैकी १ हजार २०० शिक्षकांकडे दिव्यांग प्रमाणपत्र आहेत. ते त्याचा लाभ देखील उचलत आहेत. तर संबंधित गटशिक्षणाधिकारी दिव्यांग प्रमाणपत्राची शहानिशा न करता त्यांना संवर्ग-१ चा लाभ देत आहेत. ज्या शिक्षकांची मूळ आस्थापना दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे झाली आहे. अशा शिक्षकांना संवर्ग-१ चा लाभ देण्यात यावा व ज्या शिक्षकांनी आस्थापनेनंतर दिव्यांग प्रमाणपत्र सादर केले आहे, अशा शिक्षकांच्या दिव्यांग प्रमाणपत्राची उच्चस्तरीय चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करावी, अन्यथा तिव्र आंदोलन करण्याचा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शेख रऊफ शेख पाशा जमीनदार व ॲड.प्रमोद नरवाडे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे.

# ग्रामीण पोलीसांनी काढली सराईत गुन्हेगारांची धिंड



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ मार्च**

ग्रामीण पोलिसांनी आज सराईत गुन्हेगारांची सिडको-हडको परिसरात धिंड काढली.

दिग्विजय नाडागुडे, गणेश मोरे, डोरेमॉन उर्फ संघरत्न वाघमारे या आरोपीविरुध्द जवळपास दहा ते पंधरा गुन्हे दाखल असून, यांच्यावर एमपीडीए अंतर्गत प्रतिबंधक कारवाई झालेली आहे. त्याचबरोबर ते एक ते दिड वर्ष तुरुंगात होते. यानंतरही त्यांच्यात कुठलीही सुधारणा झाली नाही. तुरुंगातून बाहेर आल्यानंतरही अनेक गंभीर गुन्हे केले आहेत. तलवारी घेवून फिरणे, जिवेघणा हल्ला करणे, यातीलच एका आरोपीने भय्या मिराशे याने पोलिसावर हल्ला केला होता. या आरोपीबद्दलची समाजातील दहशत कमी व्हावी, लोकांच्या मनात सुरक्षिततेचे वातावरण निर्माण व्हावे यासाठी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकाने या सराईत गुन्हेगारांची सिडको, हडको परिसरातून धिंड काढली.

# गावठी पिस्टल विक्री करणाऱ्या दोघांना अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ मार्च**

गावठी पिस्टल विकणाऱ्या दोघांना वजिराबाद गुन्हे शोध पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून तीन गावठी पिस्टल, सात जिवंत काडतूसे असा एक लाख २२ हजार आठशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शहरातील हिंगोली गेटजवळ फटाका मैदानामध्ये दोन जण गावठी पिस्टल विक्री करण्यासाठी थांबले असल्याची माहिती मिळाल्यावरुन वजिराबार पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने दि.२७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास रोहित नरेंद्र ताटीपामुलवार रा.अंबड जि.जालना ह.मु.भावेश्वर नगर चौफाळा व भागवत विष्णू डोंगरे रा.बाजीउमर जि.जालना ह.मु.भावेश्वर नगर चौफाळा या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे तीन गावठी पिस्टल, सात जिवंत काडतूस आढळून आले.

# श्री क्षेत्र उमरज धाकटे पंढरपूर लाखो भाविकांचे श्रद्धास्थान : अजित पवार

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ०१ मार्च**

संत नामदेव महाराज संस्थान श्री क्षेत्र उमरज हे महाराष्ट्रातील प्रति पंढरपूर धाकटे पंढरपूर म्हणुन संबोधले जाते हे देवस्यान लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान आहे या देवस्थान चा काया पालट करण्यासाठी भरघोस असा नीधी उपलब्ध करुन दिला जाईल अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी उमरज येथील कार्यक्रमात भाविकभकांना संबोधताना दिली दिनांक २८ फेब्रुवारी रोजी उमरज येथे १०८ कुंडी यज्ञ सह मंदीर कलशारोहण कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजीत दादा पवार पुढे बोलताना असे म्हनाले कि देवस्थांनचा कायापालट करण्याचं काम दूरदृष्टीने सतगुरु संतएकनाथ गुरु नामदेव महाराज



यांनी केलं. प्रत्यक्षात पंढरपूर सारखच या ठिकाणी भव्य दिव्य नेत्र दीपक असं मंदिर बांधकाम . भक्तनिवास, भव्यदिव्य सभागृह हे या भागाचे विद्यमान आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रयत्नातून झाले.या सोबतच धार्मिक सत्संग भारतातील प्रख्यात भागवताचार्य देविका नंदजी ठाकूर यांच्या अमृतवाणीतून या भागातील लाखो भाविक भक्तांना ज्ञान अमृत पाजण्याचे काम संस्थांच्या वतीने एकनाथ महाराजांनी या भव्य १०८कुंडी यक्षयाग ज्ञान यज्ञ सोहळा व श्रीमद् भागवत ज्ञान यज्ञ कार्यक्रमाच्या माध्यमातून केल.

या मंदिर संस्थांच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून येथील विद्यमान आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे सतत प्रयत्नशील असतात. उमरज संस्थानला केंद्रीय निधीतून रस्ता जोडण्याचं काम त्यांच्या प्रयत्नातून झालं. उंब्रज पासून पुढे माळाकोळी पर्यंतच्या रस्त्याची मागणी संत एकनाथ महाराजांनी अजितदादा पवार यांच्याकडे केली. निधीसाठी आम्ही कुठेच कमी पडणार नाही. या संस्थांचा आणखी विकास झाला पाहिजे. भरभरून निधी देण्यात येईल यासाठी पाठपुरावा करण्यासाठी तुमचे आमदार कणखर आहे त.ते नकीच करतील. आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी या मंदिर संस्थांच्या विकासासाठी मी कटिबद्ध असून कुठेच तसुभरही कमी पडणार नाही. या संस्थांनला महाराष्ट्राच्या नकाशात झळकावल्याशिवाय राहणार नाही.

याप्रंसगी महाराष्ट्राचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील, विद्यमान आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, शिक्षक आमदार विक्रमजी काळे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण पाटील चिखलीकर,नांदेड जिल्हा राष्ट्रवादीचे अध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी कंधार तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर , उपस्थित होते.

# मनपाचा ६७८ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

## कोणतीही करवाढ नाही : ९ कोटी ४५ लाख ९२ हजार शिल्लक

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी:-** २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठीचा ९ कोटी ४५ लाख रुपये शिलकेच्या व ६७९ कोटी ११ लाख ७८ हजार रुपये खर्चाच्या अर्थसंकल्पास महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय बैठकीतून मान्यता बहाल करण्यात आली.

येथील बी. रघुनाथ सभागृहात मनपाचे प्रशासक तथा आयुक्त धैर्यशिल जाधव यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास अर्थसंकल्पीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतून आयुक्त जाधव यांनी आगामी आर्थिक वर्षासाठीचा शिलकी अर्थसंकल्प सादर . आगामी वर्षात एकूण ६७८ कोटी ५७ लाख १० हजार रुपये जमा होतील व ६७९ कोटी ११ लाख ७८ हजार रुपयांचा खर्च होईल, असा अंदाज वर्तविण्यात आला. ९ कोटी ४५ लाख ९२ हजार रुपये शिलकेच्या अर्थसंकल्पास मान्यता बहाल करण्यात आली. , या अर्थसंकल्पात कोणतीही करवाढ नाही, अशी माहिती महापालिकेच्या सूत्रांनी दिली.

### कोणतीही करवाढ नाही : ९ कोटी ४५ लाख ९२ हजार शिल्लक

### मनपाद्वारे उत्पन्न वाढीचा संकल्प...

या अर्थसंकल्पीय बैठकीत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती भक्कम व्हावी, या दृष्टीने संकल्प व्यक्त करण्यात आला. विशेषतः उत्पन्न वाढीसाठी मालमत्तांच्या भाडेपट्टीतून उत्पन्नासह दैनंदिन बाजार वसूली, साप्ताहिक बाजार वसूली महापालिकेद्वारेच करावयाचा संकल्प सोडण्यात आला. वैद्यकीय परिपूर्ती फंड निर्मितीचा व त्याद्वारे कर्मचाऱ्यांना आवश्यक वैद्यकीय प्रतिकृती द्यावयाचा संकल्प सोडण्यात आला.

### ई-बससेवेचाही संकल्प...

या अर्थसंकल्पीय बैठकीतून शहरांतर्गत वाहतूक सुरळीत व्हावी या दृष्टीन ई-बससेवा सुरु करण्याचाही संकल्प सोडण्यात आला. त्यासाठी महापालिकेद्वारे ई-बस खरेदी संदर्भातही गांभीर्याने विचारमंथन सुरु आहे, अशी माहिती देण्यात आली.




## संक्षिप्त वृत्त...

### सेलूत आज माकपचे राज्य अधिवेशन

**सेलू,/प्रतिनिधी :** मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाचे २४ वे राज्य अधिवेशन सेलूत २७, २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी होणार असून या तीन दिवशीय अधिवेशनानिमित्ताने मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाचे पॉलिट ब्यूरोचे केंद्रीय समन्वयक कॉ. प्रकाश कारत हे उपस्थित राहणार .

सेलू येथील साई नाट्यगृहात हे तीन दिवशीय अधिवेशन २७,२८ फेब्रुवारी, १ मार्च या कालावधीत होणार . अधिवेशनाचे उद्घाटन २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता केंद्रीय समन्वयक कॉम्रेड प्रकाश कारत यांच्याहस्ते होणार . यावेळी विशेष अतिथी म्हणून माजी खासदार तथा प.बंगाल पॉलिट ब्यूरोचे सदस्य कॉम्रेड निलोत्पल बसु, पॉलिट ब्यूरो सदस्य अशोक ढवळे व स्वागताध्यक्ष प्रा. भाई यू. आर. थोंबाळ तथा अधिवशेनाचे अध्यक्ष म्हणून पक्षाचे राज्य सचिव कॉम्रेड डॉ. उदय नारकर यांची उपस्थिती असणार . या ३ दिवसीय अधिवेशनात राज्यातील ३१ जिल्ह्यातील सुमारे ४५० निवडक प्रतिनिधी सहभागी होणार .

अधिवेशनात राज्यातील सद्य राजकीय, सामाजिक, परिस्थिती, धर्मांधता, जातीय विद्वेष, केंद्र व राज्य सरकारचे जनता विरोधी धोरण, तसेच दलित, आदिवासी, मुस्लिम, महिला शेतकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी, युवक, व्यापारी, छोटे उद्योजक यांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा करून पुढील काळातील आंदोलनाची हाक देण्यात येणार .

या अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी कॉम्रेड रामेश्वर पौळ, रामकृष्ण शेरे पाटील, दत्तुसिंग ठाकूर, उद्धव पौळ, दिपक लिपणे, रामराजे महाडिक, नसिर शेख, अशोक बुरखुंडे, सुभाष शहाणे, इंदुमती महाडिक, राजू दक्ष यांच्यासह अन्य कार्यकर्ते परिश्रम घेत .

### बिदर-हजरत निजामुद्दीन विशेष रेल्वेची एक फेरी

**परभणी,/प्रतिनिधी :** प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून दक्षिण मध्य रेल्वेने बिदर ते हजरत निझामुद्दीन दरम्यान विशेष गाडीची एक फेरी पूर्ण करण्याचे ठरविले . ही विशेष गाडी विकाराबाद, सिकंदराबाद, निझामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, हिंगोली, वाशीम, अकोला मार्गे धावणार .

गाडी क्रमांक ०७२२३ बिदर ते हजरत निजामुद्दीन ही विशेष गाडी बिदर येथून बुधवारी (दि.२६) सकाळी ६ वाजता सुटेल आणि झहीराबाद, विकाराबाद, लीम्गाम्पल्ली, सिकंदराबाद, मेडचल, आकनापेट, कामारेद्दी, निझामाबाद, बासर, धर्माबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, हिंगोली, वाशीम, अकोला, मलकापूर, बर्हाणपूर, खांडवा, इटारसी, भोपाल, संत हिर्दाराम नगर, सेहोर, उज्जैन, नागडा, कोटा, मथुरा, पालवाल मार्गे हजरत निजामुद्दीन येथे गुरुवारी रात्री १०.४० वाजता पोहोचेल. तर गाडी क्रमांक ०७२२४ हजरत निजामुद्दीन ते बिदर ही विशेष गाडी हजरत निजामुद्दीन येथून शनिवारी( दि. १ मार्च) सकाळी ७.४५ वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच सोमवारी पहाटे ४ वाजता बिदर येथे पोहोचेल. या गाडीत द्वितीय शय्या, वातानुकुलीत असे एकूण २४ डब्बे असतील, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली.

### आधार संमती आणि ना हरकत प्रमाणपत्र सादर करावे

कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आवाहन : २८ फेब्रुवारी पर्यंत मुदत

**परभणी,/प्रतिनिधी :** कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना खरीप २०२३ हंगामातील अर्थसहाय्य योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार संमती व ना हरकत प्रमाणपत्र सादर करण्याची अंतिम मुदत २८ फेब्रुवारी २०२५ असल्याचे कृषि विभागाने जाहीर केले .

योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्रति हेक्टर रु. ५०००/- या प्रमाणे, कमाल २ हेक्टरपर्यंत अर्थसहाय्य मिळणार . यासाठी खरीप २०२३ मध्ये ई-पिक पाहणी केलेले तसेच ७/१२ उताऱ्यावर कापूस किंवा सोयाबीन पिकाची नोंद असलेले शेतकरी पात्र ठरणार . शेतकऱ्यांनी ... या पोर्टलवर जाऊन आपल्या नावाची खात्री करावी किंवा संबंधित कृषि सहाय्यकांशी संपर्क साधावा. तसेच, ई-पिक पाहणी न केलेल्या शेतकऱ्यांनी तलाठी व वनपट्टेदार शेतकऱ्यांनी तहसील/जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

योजनेचा लाभ घेण्यासाठी वैयक्तिक खातेदारांनी आधार संमती, तर सामाईक खातेदारांनी आधार संमतीसह ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य . ना हरकत प्रमाणपत्राचा नमुना कृषी सहायक यांच्याकडे उपलब्ध . अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी किंवा कृषि सहाय्यकांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले .

### ज्ञानसाधना'च्या दोन विद्यार्थ्यांची विज्ञान वारीसाठी निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** ज्ञानसाधना प्रतिष्ठानच्या विद्यार्थिनी रितिका दीपकराव कदम व ऋतुजा गजानन सामाले यांची परभणी ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीच्या वतीने विज्ञान दिनानिमित्त आयोजित केलेल्या विज्ञान वारीसाठी निवड करण्यात आली . या विद्यार्थ्यांना रविवारी मान्यवरांच्या हस्ते निवडीचे प्रमाणपत्र देण्यात आले.

तरुण भारत

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

### महाशिवरात्री दिनी महादेव मूर्ती प्रतिष्ठापना उत्साह

**ज्ञानोबा कदम**

गंगाखेड :- गंगाखेड तालुक्यातील सुनेगाव (सायाळा) येथील कृष्णा सुर्यवंशी व त्याच्या तरुण सहकाऱ्यांनी एकत्र येऊन दि. २६ फेब्रुवारी बुधवार रोजी महाशिवरात्री दिनी इंद्रायणी स्मृति उद्यानामध्ये भव्य अशी महादेवाची मूर्ती बसवण्यात आली, यावेळी स्वामीजींच्या हस्ते मूर्तीची विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी गावातील बहुसंख्य तरुण उपस्थित . हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी गावातील तरुणांनी परिश्रम घेतले.



### लायन्सतर्फे मोफत कॅन्सर स्क्रिनिंग शिबीर

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील लायन्स क्लबच्या वतीने शुक्रवार २८ फेब्रुवारी रोजी मोफत कॅन्सर स्क्रिनिंग (निदान) व उपचार सल्ला शिबीर आयोजित करण्यात आले . डॉ. साने चौकातील डॉ. सालेहा कौसर हॉस्पिटल मध्ये हे शिबीर सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत होणार असून या शिबीरात डॉ. श्रीमती सालेहा कौसर, डॉ. राहुल राठोड, डॉ. मनोज मोरे हे तज्ञ डॉक्टर्स तपासणी करणार . यावेळी या शिबीराचा संबंधितांनी लाभ घ्यावा, असे आवाहन लायन्स क्लबचे अध्यक्ष पंडीत बरदाळे, सचिव माधव मंडगे व कोषाध्यक्ष सतीश चौधरी यांनी केले .प्रशासनाने अतिशय काटेकोरपणे नियोजन केले .

### दुर्गेश परुळकर यांचा व्याख्यानास प्रतिसाद

**परभणी,/प्रतिनिधी :** स्वातंत्र्यवीर सावरकर आत्मार्पण दिनानिमित्त बुधवार २६ फेब्रुवारी रोजी प्रसिध्द लेखक जाज्वल्य राष्ट्रभक्त अन् हिंदुत्ववादी वक्ते दुर्गेश परुळकर यांचे परभणीत व्याख्यान होणार .

स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य अभ्यास मंडळ व कै. विठ्ठलराव धानोरकर स्मृती सावरकर व्याख्यानमाला यांच्या संयुक्त विद्यमाने रंगनाथ नगरातील वैष्णवी मंगल कार्यालयाच्या सभागृहात सायंकाळी ५ वाजता परुळकर यांचे 'महाकवी सावरकर' या विषयावर हे व्याख्यान होणार . कवयित्री प्रा. सौ. संजीवनी खोत या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार असून सर्व सावरकर प्रेमींनी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद धानोरकर, उपाध्यक्ष सर्वश्री सुभाष कुलकर्णी प्रविण सराफ व कार्याध्यक्ष डॉ. दीवारक कुलकर्णी मांडाखळीकर यांनी केले .



**परभणी- महाशिवरात्रीनिमित्त भाविक भक्तांना फराळाचे वाटप माजी नगरसेवक गणेश देशमुख, यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी गजानन नागरे, संजय गुळगुळे, आबा ढोले, विशाल भराड, सचिन आडे दिसत आहेत.**

## परभणीत ७ मार्चपासून मराठवाडा विभागीय कृषी महोत्सव

### स्टेडिअम मैदानावर संस्कृती, साहित्य व प्रदर्शन : चर्चासत्र व मेळावे

**परभणी ,/प्रतिनिधी-** श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित) च्या वतीने ७ ते १० मार्च दरम्यान परभणीतील प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडिअम मैदानावर मराठवाडा विभागीय कृषी महोत्सव २०२५चे आयोजन करण्यात आले .

या महोत्सवात विभागीय कृषी प्रदर्शन व तज्ञांचे चर्चासत्र आयोजित करण्यात येणार असून नामांकित कंपन्यांचे खत, औषधे, आधूनिक यंत्र सामूग्री, सेंद्रीय व जैविक तंत्रज्ञान, शेती उपयोगी विविध अवजारे, केळी, कपाशी, टिशू कल्चर बि-बियाणे, पशू खाद्य, अपारंपारिक उर्जा, प्रक्रिया उद्योग, पॉली हाऊस, कृषि विमा, बँक, कृषि पर्यटन व कृषि संबंधित वैविध्यपूर्ण बाबींचा सहभाग असणार . मराठवाडा कृषी संस्कृती दर्शन, खाद्य संस्कृती, सण-उत्सव मांडणी, पूर्वीची समृध्द पर्यावरण पूरक गावे, त्यातील विज्ञान, पशूधन व गोवंश प्रदर्शन, त्यातून पशू आणि गोवंशातील प्रजातींसह गोठ्यांचे प्रात्यक्षिकांसह माहिती, पशूखाद्य, चाऱ्यांचे विविध प्रकार, डेअर उत्पादन, आधूनिक तंत्रज्ञान, दुग्ध व्यवस्थापनाबाबत माहिती व प्रात्यक्षिके दिली जाणार . दूर्मिळ वन औषधी व रान भाज्यांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात येणार असून त्यातून आयूर्वेदिक शेती, बाजारपेठ याची माहिती, दुर्मिळ वन औषधींची मांडणी, उपयोग, प्रबोधन केले जाणार . तसेच मोफत आरोग्य व व्यसनमुक्ती शिबीर, शेतकरी वधू-वर परिचय मेळावा, कृषि व इतर क्षेत्रातील रोजगार या संदर्भात माहिती दिली जाणार .

७ मार्च रोजी सकाळी ९ वाजता कृषि दिंडी सोहळा, १० वाजता उद्घाटन सोहळा, १ वाजता विषमुक्त शेती सत्र, ३ वाजता पशू गोवंश सत्र तर ८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता युवा कृषि नवचैतन्य अभियान, १२ वाजता शेतकरी वधू-वर परिचय मेळावा, ९ मार्च रोजी सकाळी ९ वाजता पर्यावरण प्रकृती जनजागृती अभियान, १२ वाजता स्वयंरोजगार चर्चासत्र व महिला बचतगट मेळावा तर १० मार्च रोजी सकाळी ९ वाजता माहिती तंत्रज्ञान जनजागृती अभियान, १२ वाजता सरपंच-ग्रामसेवक मांदियाळी, दुपारी ४ वाजता प.पु. गुरुमाऊली यांचे हितगुज, सायंकाळी ६ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम होणार . मराठवाडा विभागातून मोठ्या संख्येने शेतकरी, कृषी अभ्यासक, व विद्यार्थी, कृषी सामाजिक संस्था, कृषी संशोधक उपस्थित राहतील. हा उपक्रम शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे आणि प्रवेश मोफत आहे अशी माहिती आयोजक संदिप देशमुख यांनी दिली.

## मनपाद्वारे मोकाट जनावरे पकडण्याची मोहीम

### १४ मोकाट पशु, जनावरे मालकांना दंड : ४ जनावरे कोंडवाडा विभागात बंदीस्त

**परभणी,/प्रतिनिधी :** शहर महानगरपालिकामार्फत १० फ ेब्रुवारीपासून शहरातील मोकाट जनावरे पकडण्याच्या मोहिम सुरु करण्यात आली असून आजपर्यंत १८ मोकाट जनावरे पकडण्यात येऊन कोंडवाडा विभागात जमा, बंदिस्त करण्यात आली .

पकडण्यात आलेल्या या १८ पैकी १४ मोकाट पशु, जनावरे मालकांना दंड आकारुन परत देण्यात आलेली . दंडाची एकुण रक्कम ११ हजार ९०० रुपये वसुल करण्यात आली . त्याचबरोबर पशुपालकांना यापुढे मोकाट जनावर रस्त्यावर फिरणार नाहीत किंवा सोडली जाणार नाहीत याची दक्षता घेण्याची सक्त ताकीद देण्यात आलेली . तर उर्वरित ४ जनावरे कोंडवाडा विभागात बंदीस्त . ही मोहीम यापुढे सातत्याने चालू राहणार .

वारंवार जनावरे रस्त्यावर सोडल्याचे आढळून आल्यास जनावर मालकांविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार . तसेच जनावरांमुळे कोणताही अनुचित घटना घडल्यास त्याचीही जबाबदारी संबंधित मालकावर निश्चित करुन फौजदारी गुन्हा देखील महापालिकेमार्फत दाखल होऊ शकतो. त्यामुळे पशूपालकांनी पाळीव पशु, प्राणी रस्त्यावर मोकाटपणे सोडू नयेत, असे आवाहन महापालिका आयुक्त धैर्यशील जाधव यांनी केले .



## उपविभागीय अधिकाऱ्यांसह सातजण निलंबित

### कृषि विभागात घोटाळा : समृद्धी महामार्गात येणाऱ्या वृक्षांचे चुकीच्या पद्धतीने वाढीव मूल्यांकन केल्याचे प्रकरण

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्ह्यातून जाणाऱ्या समृद्धी द्रुतगती महामार्गाअंतर्गत येणाऱ्या वृक्ष, विहीर व घरांचे चुकीच्या पद्धतीने वाढीव मूल्यांकन केल्याप्रकरणी राज्य शासनाने परभणीचे उपविभागीय कृषी अधिकारी रवींद्र हरणे यांच्यासह ७ जणांना निलंबित केले .

समृद्धी महामार्गात येणाऱ्या वृक्षांचे चुकीच्या पद्धतीने वाढीव मूल्यांकन केल्याप्रकरणी उपविभागीय कृषी अधिकारी रवींद्र हरणे, सेलू तालुका कृषी अधिकारी शेरन ताजमोहम्मद पठाण, मंडळ कृषी अधिकारी रामप्रसाद जोगदंड, कृषी अधिकारी अशोक कदम, मंडळ कृषी अधिकारी राजहंस खरात, कृषी पर्यवेक्षक प्रकाश लोहार, कृषी पर्यवेक्षक दिगंबर फुलारी या सात जणांना निलंबित करण्यात आले .

जालना- परभणी व नांदेड या तीन जिल्ह्याला खऱ्या अर्थाने समृद्ध करणाऱ्या या जालना ते नांदेड द्रुतगती महामार्गाचे काम एमएसआरडीसीद्वारे केले जात . परभणी जिल्ह्यातील ४७ गावातून ९३.५२ किलोमीटर हा महामार्ग जाणार . या महामार्गासाठी जिल्ह्यातील ९३३ हेक्टर क्षेत्र जमीन संपादित करण्यात आली . या महामार्गामुळे मुंबई आणि नांदेड दरम्यानचा १२ तासाचा प्रवासही निम्म्यावर येणार . सध्या या महामार्गाचे काम सुरू झाले . परंतु दुसरीकडे या महामार्गावर येणाऱ्या वृक्ष, विहीर, शेततळे, घर व पाईपलाईन यासह आदींचे चुकीच्या पद्धतीने वाढीव मूल्यांकनाचा अहवाल उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांसह सेलू तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने जिल्हा प्रशासनाला सादर केला . या अहवालावर तत्कालीन जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी आक्षेप नोंदविला. त्यानंतर चुकीच्या पद्धतीने काम करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गोयल यांनी कार्यवाहीसाठी हा अहवाल राज्य शासनाकडे पाठवला .




बीड : जिल्ह्यात यंदा गव्हाचा पेरा मोठ्या प्रमाणात झालेला होता. सध्या काढणी सुरू असून मोठमोठे मशीन बाहेर राज्यातून दाखल झाले आहेत. यामुळे गहू काढणीचे काम अधिक गतीने होत असल्याचे चित्र आहे. (छाया. कृष्णा शिंदे)




गेवराई तालुक्यातील मन्यारवाडी येथील शेतकरी मनेश्वर डिगरे यांच्या शेतातील टरबुजाचे पिक

# विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टीकोन वाढवणे हा विज्ञान दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश-सुर्यकांत उजगरे

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१ मार्च**

येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयात आज दि.२८/२/२५ शुक्रवार रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने विज्ञान जागृती कार्यक्रमाचे आयोजन विज्ञान विभागाच्या वतीने करण्यात आले होते.या सकाळ सत्राच्या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,तर व्यासपीठावर अभ्यास पुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे, विज्ञान विषय प्रमुख तथा जेष्ठ विज्ञान शिक्षीका वर्षा मुंडे ह्या उपस्थित होत्या.तर दुपारच्या सत्रासाठी अध्यक्ष म्हणून प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,तर व्यासपीठावर महानंदा मुंडे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती, अहिल्याबाई होळकर,व सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आले.नंतर मान्यवरांचे यथोचित स्वागत करण्यात आले.स्वागता नंतर - ख ह्या नवीन तंत्रज्ञानाबद्दल कौस्तुभ मातेकर ह्या विद्यार्थ्यांने अभ्यास पुर्ण माहिती दिली.त्यानंतर विज्ञान विषयावर तुकडीनिहाय आधारित प्रश्नमंजुषा



घेण्यात आली. इ.९ वी ची कौस्तुभ मातेकर,यज्ञेश धाट यांनी तर इ.८वी ची ऋत्विज कुलकर्णी ,व्यंकटेश नाटकर यांनी घेतली.विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.नंतर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विज्ञान विषयाच्या भित्तीपत्रकांचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. तर दुपारच्या विभागात अंधश्रद्धा निर्मुलन या विषयावर आधारित नाटीकेचे सादरीकरण केले.सदरील कार्यक्रम दोन्ही विभागात घेण्यात आला.दुपारच्या सत्राचे अध्यक्ष प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी मार्गदर्शन करताना म्हणाले की,विज्ञानाची दृष्टी प्रत्येकांनी स्वतःच्या अंगी बाणवली पाहिजे.तर सकाळच्या सत्रात अध्यक्षीय समारोप करताना पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे म्हणाले की,विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढावा याकरिता विज्ञान दिन साजरा केल्या जातो.विज्ञानाची दृष्टी प्रत्येक विद्यार्थ्यांने वापरल्यास आपल्या शास्त्रज्ञ तयार होतील.आपल्या जीवनात विज्ञाननिष्ठा वाढवा.त्यातून आपला वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत होईल.असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यश शिंदे, आदित्य कावळे,स्वागत व परिचय ऋत्विज कुलकर्णी, प्रास्ताविक व्यंकटेश नाटकर, विज्ञान गीत सृष्टी होळकर,आभार सत्यम चव्हाण, कल्याण मंत्र यज्ञेश धाट,ऋत्विज कुलकर्णी यांनी घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,अभ्यास पुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,विश्वास पत्की,विज्ञान विषय प्रमुख वर्षा मुंडे,महानंदा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विज्ञान शिक्षक,व सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१ मार्च**

छ. शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इतिहास विभाग व सुंदर रत्न करिअर अकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने शिवचरित्रावर आधारित राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक वितरीत करण्यात आले.यामध्ये साधना टाकणखार हिने प्रथम पारितोषिक पटकावले.



सुंदरराव सोळंके महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने मागील सात वर्षापासून राष्ट्रीय व राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात येते. यावर्षी स्पर्धेसाठी विविध महाविद्यालयातील स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.स्पर्धेचे पारितोषिक वितरणाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जी. के. सानप होते तर प्रमुख पाहुणे श्री. सिद्धेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी होते .यावेळी उपप्राचार्य डॉ.एन.के.मुळे, उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, इतिहास विभागप्रमुख प्रा.बालाजी बोडके,प्रा.सुदर्शन स्वामी,डॉ.गोवर्धन फसले,प्रा. अलझेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यस्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेत कु.साधना कैलास टाकणखार (प्रथम), मोहीनी चंद्रशेखर पायघन (द्वितीय), निकिता लक्ष्मण लांडगे (तृतीय) तर निता लक्ष्मण राठोड व आरती दामोदर वाघमारे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम,स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. बालाजी बोडके यांनी केले. सूत्रसंचालन कु.दिपाली शेजुळ यांनी केले तर आभार प्रा सुदर्शन स्वामी यांनी मानले. यावेळी डॉ. के.बी. गंगने, डॉ.संजय व्यवहारे, डॉ गणेश मोकासरे,डॉ सुरेश देशमुख,प्रा.सतीश डाके, प्रा. आनंद वैजवाडे यांच्यासह विद्यार्थी - विद्यार्थिनी,स्पर्धेक, प्राध्यापक उपस्थित होते.

# माजलगाव मठातर्फे २८ एप्रिल रोजी सामुहिक विवाह सोहळा

## सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी यांच्या संजीवन समाधी उत्सव सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम
## मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१ मार्च**

वीरशैव लिंगायत समाजाचे धार्मिक अधिष्ठान असलेल्या सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी यांच्या संजीवन समाधी उत्सव सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, सोमवार, दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी वीरशैव लिंगायत समाजातील तरूण-तरूणींच्या सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज माजलगावकर यांनी दिली.



सिद्धयोगी शिवैक्य श्रीगुरू तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य माजलगावकर महाराज यांच्या प्रेरणेने वीरशैव लिंगायत समाजातील तरूण-तरूणींचा सामुहिक विवाह सोहळा होणार आहे. तरी वीरशैव लिंगायत समाजातील सर्व पोटजातीतील विवाह इच्छुकांनी सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठ माजलगाव येथे शिवहारआप्पा महाजन (मो. ८२७५८५२८९८), राजाभाऊआप्पा लोखंडे (मो.९०४९९४८१६१), संजयआप्पा मोगरेकर (मो.९८९०७१८८८८) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही मठातर्फे करण्यात आले आहे. येत्या चैत्र अमावस्येला विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात रविवार, दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी यांच्या संजीवन समाधी उत्सव सोहळ्यानिमित्त लघुरूद्राभिषेक, आरती व श्रीगुरूंचे आशिर्वचन होणार असून सोमवार, दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी वीरशैव लिंगायत समाजातील तरूण-तरूणींच्या सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले, असल्याची माहिती सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठातर्फे देण्यात आली आहे.

तपोरत्नं वैदिक पाठशाळेचे सलग २१ दिवस वर्ग

अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्तावर बुधवार, दिनांक ३० एप्रिल २०२५ पासून ते मंगळवार, दिनांक २० मे २०२५ पर्यंत जंगम विद्यार्थ्यांसाठी तपोरत्नं वैदिक पाठशाळेचे शिबीर सलग २१ दिवस होणार आहे. यात शिबिरार्थी मुलांना दररोज प्रार्थना, रूद्राभिषेक आणि महापूजा करावयाची विधीचे मार्गदर्शन केले जाईल. त्यानंतर शिबिरार्थींना रूद्रपठणाचे अध्ययन केले जाणार आहे. आदर्श जीवन जगण्याची पध्दती याचे संस्कारही मुलांना दिले जातील. एकंदरीत वैदिक परंपरेतील विधी त्याचे महत्त्व आणि महात्म्य पटवून दिले जाईल. सलग २१ दिवस मुलांना गुरूजणांमार्फत सखोल अध्यात्म ज्ञान दिले जाईल, अशी माहितीही मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली.

# आनंदगाव येथे शिवजन्मोत्सवानिमित्त बाळराजे आवारे पाटील यांचा भव्य सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१ मार्च**

तालुक्यातील आनंदगाव येथे छत्रपती शिवरायांचे भव्य स्मारक उभारण्यात आले आहे.शिवजयंती निमित्त कार्यक्रम घेण्यात आला. जय जिजाऊ जय शिवराय चा जयघोष सर्वत्र घुमला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सरपंच अंजना गोविंद गायकवाड, प्रमुख पाहुणे चळवळीत अग्रेसर असणारे, धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संघटनेचे बाळराजे आवारे पाटील,सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांचा गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.



यावेळी बोलताना बाळराजे आवारे पाटील म्हणाले छत्रपती शिवरायांचा विचार महाराष्ट्रभर घेऊन जाण्यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे.गजानन गुरुकुलचे विद्यार्थी यांनी विविध देखावे सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. बाळराजे आवारे पाटील यांच्या हस्ते पुतळ्यास अनावरण करून पूजन करण्यात आले.

कार्यक्रमास गावातील नागरिक महिला,विद्यार्थी, शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ हनुमंत सौदागर यांनी केले तर आभार नामदेव गायकवाड यांनी मानले.

# सावरकरांचे काव्य म्हणजे क्रांती रसाची कारंजी - डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर



**सावरकर संकुलात अभिवादन कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ मार्च**

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मराठी साहित्यातील सर्व साहित्यप्रकार अतिशय सहजपणे हाताळले, त्यांची प्रतिभा महाकवीची होती. सावरकरांचे काव्य म्हणजे क्रांती रसाची कारंजी आहेत असे प्रतिपादन डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले.येथील सावरकर महाविद्यालयात आत्मार्पण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की स्वातंत्र्यवीर सावरकरांनी २४ दिवस अन्नाचा त्याग करून आपला देह भारत मातेच्या चरणी अर्पण केला. आत्मसमर्पण केले. प्रखर राष्ट्रभक्त, कुशल संघटक, इतिहासकार, महान साहित्यिक, श्रेष्ठ नाटककार, उत्तम वक्ते, असे त्यांच्या जीवनाचे सर्व पैलू प्रेरणादायी आहेत. यावेळी महाविद्यालय समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य उमेश जगताप, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पी. के. कुलकर्णी, प्रमोद कुलकर्णी, एस. एन. कुलकर्णी, नगरसेवक सुभाष सपकाळ, मधुकरराव वैद्य,यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, मुख्याध्यापक विठ्ठल काळे, मुख्याध्यापिका बालिका देशमुख, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, सावरकर संकुलातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# ईगलवुड पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये रक्तदान तथा मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१ मार्च**

ईगलवुड पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने रक्तदान तथा मरणोत्तर नेत्रदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी २३ रक्तदात्यांनी रक्तदान केले तर १० जनांनी मरणोत्तर नेत्रदान करण्याची नोंद केली.




कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.स्नेहलता पाठक, पत्रकार अजिंक्य वाघमारे, व्य. मानव विकास मंडळाच्या अध्यक्षा तसेच प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. अर्चना पवार उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान या इन्स्टिट्यूटचे प्राचार्य प्रतीक वेळापुरे सरांनी भूषवले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.स्नेहलता पाठक यांनी सावरकरांच्या जाज्वल्य जिवनचरित्रावर प्रकाश टाकला आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन कार्य करण्याचे आवाहन केले. तसेच डॉ. अर्चना पवार मॅडम यांनी रक्तदानाचे तथा मरणोत्तर नेत्रदानाचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांमध्ये याबद्दल जागृती निर्माण करून नेत्रदान करण्यास प्रोत्साहित केले.

शिबिरात २३ रक्तदात्यांनी रक्तदान केले तसेच १० नेत्रदाते मरणोत्तर नेत्रदान करण्यास नोंदणीकृत झाले.या रक्तदान शिबिरासाठी नितीन सोळंके यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा ग्रामीण रुग्णालय बीड येथून पथक आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी सिद्धि मानधने तर आभार महेश जाधव यांनी मानले.